भारतीय स्वातंत्र्यदिन चिरायू होवो!

भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा. स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या लाखो ज्ञात, अज्ञात देशभक्तांना कृषीवल परिवारातर्फे विनम्र अभिवादन. तसेच वाचक, जाहिरातदार, हितचिंतकांनाही शुभेच्छा.

– मुख्य संपादक, कृषीवल



रायगड, शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹




# बालस्वास्थ्य बिघडले

प्रमोद जाधव

। अलिबाग ।

राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील हजारो शाळा, अंगणवाड्यांमध्ये जाऊन लाखो विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जाते. परंतु, या उपक्रमाला गाड्यांच्या अभावी ब्रेक लागला आहे. डॉक्टर, परिचारिका व इतर आरोग्य कर्मचाऱ्यांची, औषधांची वाहनाद्वारे ने-आण करणाऱ्या एजन्सीने गाड्या पुरविणे बंद केले आहे. राज्यस्तरीय ठेका दिलेल्या मुंबईतील एका ट्रॅव्हल्स कंपनीला जुन्या दराने वाहने पुरविणे परवडत नाही. त्यामुळे या कंपनीने गाड्या देणे बंद केले आहे. त्याचा परिणाम रायगड पान २ वर

## 93 विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया

बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत सात विद्यार्थ्यांचे हृदयाचे, तर इतर ८६ विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. ज्या शाळांमध्ये जाण्यासाठी गाड्यांची गरज नाही, त्या शाळा, अंगणवाड्यांना भेटी देऊन विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केल्याची माहिती जिल्हा रुग्णालयाकडून देण्यात आली.

## चार महिन्यांत 34 हजार विद्यार्थ्यांची तपासणी

पूर्वी वाहनांची मदत घेऊन वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व इतर वैद्यकीय कर्मचाऱ्यांना शाळा, अंगणवाड्यांमध्ये पोहोचविण्याचे काम केले जात होते. परंतु, मार्चपासून ठेकेदारांनी गाड्यांची सेवा देणे बंद केले. त्यामुळे लांब असलेल्या शाळांपर्यंत वैद्यकीय अधिकारी यांना पोहोचता येत नाही. ही योजना बंद पडू नये, म्हणून जवळच असलेल्या अंगणवाडी, शाळांमध्ये डॉक्टरांनी जाऊन भेटी दिल्या आहेत. एप्रिल ते जुलै या कालावधीत ३४ हजार विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे.



**लाखो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यास वैद्यकीय अधिकाऱ्यांना अडचणी**

**वाहनांसाठीचा राज्यस्तरीय ठेका बंद**

**04 लाख विद्यार्थीसंख्या**

जिल्ह्यात चार हजार अंगणवाड्या, जि.प. माध्यमिक, उच्च माध्यमिकच्या तीन हजारांहून शाळा-महाविद्यालयांची मिळून विद्यार्थीसंख्या चार लाखांच्या जवळपास आहे.

## किश्तवाड्यात ढगफुटी ३८ जणांचा मृत्यू

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

जम्मू-कश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यातील चशोटी परिसरात गुरुवारी दुपारी झालेल्या ढगफुटीमुळे आतापर्यंत ३८ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये जवानांचादेखील समावेश आहे. किश्तवाडमधील माचैल माता मंदिरात गुरुपारपासून यात्रेला सुरुवात झाली होती. त्यामुळे शेकडो भाविक या मंदिर परिसरात होते. त्याचवेळी येथे ढगफुटीसदृश्य पाऊस झाला व अचानर पूर आला. पुरात या भागातील शेकडो घरे व वाहने वाहून गेली आहेत. ढगफुटीनंतर या भागात तात्काळ बचावकार्य सुरू करण्यात आले. आतापर्यंत घटनास्थळावरून ३८ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत, तर ८० हून अधिक जणांना वाचवण्यात आले आहे.

## खालापुरात 'छमछम'वर छापा

### पोलिसांकडून १३ जणांना अटक

। खोपोली । प्रतिनिधी ।

शहरी भागासह पनवेल व खालापूर तालुक्याला जोडणाऱ्या मुंबई-पुणे महामार्गाला असणाऱ्या खालापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत लोधिवली येथील समुद्राबारवर १२ ऑगस्टच्या रात्री १२ वाजण्याच्या सुमारास खालापूर पोलिसांनी धडक कारवाई केली. दरम्यान, याठिकाणी अश्लील हावभाव आणि डीजेच्या तालावर नृत्य करीत असताना आढळून आल्याने १३ जणांना अटक केली आहे.

मिळाल्या माहितीनुसार, १२ ऑगस्ट रात्री १२ वाजून ४५ मिनिटाच्या सुमारास खालापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असणाऱ्या लोधिवली येथील समुद्राबारमध्ये महिला आरोपी महिला वेटर्सही संगीताच्या तालावर हावभाव व बीभत्स नृत्य करताना मिळून आले असता अन्य १२ आरोपी हे बारमध्ये आलेले ग्राहक व हॉटेलमधील स्टाफ, वेटर्स व त्यातील काही ग्राहक हे मद्य सेवन करुन सदर महिलेला अश्लील नृत्य व बीभत्स नृत्य करण्याकरीता प्रोत्साहित करीत होते. तसेच हॉटेलचे मालक आरोपी, रा. रिस, ता. खालापूर यांनी हॉटेल समुद्राबारसाठी दिलेल्या परवानगीच्या अटी व शर्तींचे उल्लंघन करीत असल्याचे माहिती मिळताच खालापूर पोलिसांनी धडक कारवाई करीत १३ जणांना अटक केल्याने सर्वत्र खालापूर पोलिसांच्या कारवाईचे कौतुक होत आहे.

याबाबत अधिक तपास पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर पोलीस हे करीत आहेत.

## नागावच्या शाळेत स्काऊट गाईड युनिट



(छायाचित्र : समीर मालोदे)

### चित्रलेखा पाटील यांच्या पुढाकाराने गणवेश भेट

। अलिबाग । प्रतिनिधी ।

शिस्त, सेवा आणि संघाची भावना निर्माण करणारे युनिट म्हणून स्काऊट गाईडकडे पाहिले जाते. नागावमधील हायस्कूलमध्ये हे युनिट सुरू करण्यात आले आहे. शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी सामाजिक बांधीलकी जपत या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी स्काऊट गणवेश मोफत भेट दिले. या गणवेशाचे वाटप गुरुवारी (दि.१४) शाळेच्या सभागृहात करण्यात आले. स्काऊट गाईडचे गणवेश मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

यावेळी नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर, उपसरपंच सुरेंद्र नागलेकर, संस्थेचे सभासद विश्वजीत जोशी, कृषीवलच्या कार्यकारी संपादक माधवी सावंत, पीएनपी एज्युकेशन सोसायटीचे जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक, पान २ वर

## स्वातंत्र्य दिनासाठी प्रशासन सज्ज

। अलिबाग । प्रतिनिधी ।

भारताचा ७९ वा स्वातंत्र्यदिन शुक्रवारी (दि.१५) जिल्ह्यात ठिकठिकाणी साजरा केला जाणार आहे. यानिमित्ताने विविध देशभक्तीपर गीतांसह सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम राबविले जाणार आहे. त्याची तयारी अंतिम टप्प्यात असून, सकाळी साडेसात वाजल्यापासून ते सकाळी नऊ वाजेपर्यंत ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडणार आहे. अलिबागमधील पोलीस मुख्यालयात सकाळी नऊ वाजून पाच मिनिटाने मुख्य ध्वजारोहणाचा कार्यक्रम होणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते जिल्ह्यातील मुख्य ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडणार आहे.

**जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. जिल्हा परिषद, पोलीस अधीक्षक कार्यालयासह उपविभागीय अधिकारी, तहसीलदार कार्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आदी ठिकाणी ध्वजारोहणाचा कार्यक्रम होणार आहे.**

यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांसह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहणार आहे. यावेळी पोलिसांमार्फत मानवंदना दिली जाणार आहे. तसेच देशभक्तीपर कार्यक्रमदेखील होणार आहेत.

## उद्या शेकापच्या दहीहंडीचा थरार

। अलिबाग । प्रतिनिधी ।

मानाचा आणि अभिमानाचा मानला जाणारा दहीहंडी उत्सव शनिवारी (दि.१६) अलिबाग शहरात दुपारी तीन वाजल्यापासून रंगणार आहे. शेतकरी कामगार पक्ष, पुरोगामी युवक संघटना अलिबाग पुरस्कृत प्रशांत नाईक मित्रमंडळ आयोजित दहीहंडी उत्सव अलिबागमध्ये पाहायला मिळणार आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून अंतिम विजेत्यांसह सलामी देणाऱ्या गोविंदा पथकांना आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहे. या उत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आहे. पान २ वर



# बालरुग्णांना मिळाले जीवनदान

■ ६१९ जणांवर हृदयविकाराची यशस्वी शस्त्रक्रिया
■ रोटरी क्लब ऑफ बॉम्बे एअरपोर्टकडून दहा कोटींचा निधी



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

**पनवेलजवळील खारघर येथील श्री सत्य साई संजीवनी सेंटर फॉर चाइल्ड हार्ट केअरमध्ये मोफत हृदय शस्त्रक्रिया करून जन्मजात हृदयविकाराने ग्रस्त सुमारे ६१९ बालरुग्णांना नवे आयुष्य मिळाले. रोटरी क्लब ऑफ बॉम्बे एअरपोर्टच्या नेतृत्वाखाली गिफ्ट ऑफ लाईफ प्रकल्पांतर्गत तसेच प्रकल्पाचे अध्यक्ष पीपी नितीन मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली या शस्त्रक्रिया करण्यासाठी सुमारे दहा कोटी रुपयांचा निधी उभारण्यात आला. जमा झालेल्या पैशातून ६१९ बालरुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.**

या बालरुग्णांना मिळालेल्या नव्या आयुष्याचा आनंद साजरा करण्यासाठी, सुप्रसिद्ध क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांनी रुग्णालयतील बालरुग्ण व त्यांच्या कुटुंबियांची भेट घेतली व त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधला.

हृदयविकार असलेल्या बालरुग्णांवर शस्त्रक्रिया ही एक आव्हानात्मक व गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. हृदयातील छिद्रे, हृदयाच्या झडपांसंबंधीत समस्या किंवा असामान्य रक्तवाहिन्या यासारख्या आजाराशी झुंजणाऱ्या रुग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यकता भासते. यावर वेळीच उपचार न केल्यास दम लागणे, मुलांची वाढ खुंटणे, वारंवार संसर्ग होणे आणि अकाली मृत्यू यासारख्या गंभीर गुंतागुंतीचा सामना करावा लागू शकतो. दरवर्षी, भारतात दोन लाखांहून अधिक मुलं जन्मजात हृदयविकारांसह जन्माला येतात आणि सुमारे ७०,००० मुलांना जन्मल्यानंतर वर्षभरातच शस्त्रक्रियेची आवश्यकता असते. मात्र आर्थिक अडचणी आणि जागरूकतेच्या अभावामुळे, अनेक मुलांना वेळीच उपचार मिळत नाही. रोटरी क्लब ऑफ बॉम्बे एअरपोर्ट आणि गिफ्ट ऑफ लाईफ प्रकल्पाचे अध्यक्ष पीपी नितीन मेहता सांगतात की, प्रत्येक मुलाला निरोगी हृदयासह जगण्याची संधी मिळायला हवी. आपल्या देशातील अशी अनेक मुलं आहेत जी कोणत्या ना कोणत्या हृदयविकाराशी झुंजत असून, त्यांच्या कुटुंबियांना शस्त्रक्रियेचा खर्च परवडत नसल्यामुळे त्यांना या आजाराशी शेवटच्या श्वासापर्यंत लढावे लागते. गिफ्ट ऑफ लाईफ उपक्रमाद्वारे, अशा बालरुग्णांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहोत. काही बाळांना जन्मानंतर काही आठवडे किंवा काही महिन्यांत शस्त्रक्रियेची आवश्यकता भासू शकते. या सगळ्या नाजूक, गुंतागुंतीच्या प्रक्रिया आहेत. परंतु यामुळे त्या बाळाचे आयुष्य वाचविता येते. वेळीच निदान, जन्मानंतर केले जाणारे स्क्रीनिंग किंवा इकोकार्डियोग्राम तपासण्या यात महत्त्वाची भूमिका बजावतात. जितक्या लवकर या आजाराचे निदान होते, तितकीच जगण्याची शक्यता अधिक प्रमाणात वाढते. वेळीच उपचार केल्यास केवळ गुंतागुंत टाळता येत नाही तर मुलाला इतर कोणत्याही बाळाप्रमाणेच निरोगी आणि सक्रिय राहता येते व जगण्याची दुसरी संधी मिळते. शस्त्रक्रियेस विलंब झाल्यास हृदयविकार, विकास खुंटणे तसेच मृत्यू ओढावू शकतो. म्हणूनच याबाबत पुरेशी जागरूकता, नियमित तपासणी आणि दर्जेदार उपचारांची उपलब्धता गरजेची आहे.

या समारंभात सहभागी झालेले दिग्गज भारतीय क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांनी या प्रकल्पाचे कौतुक केले. ते म्हणाले की, या धाडसी मुलांना भेटणे खरोखरच हृदयस्पर्शी होते. त्यांचे धाडस आणि रुग्णालय आणि रोटरी क्लबद्वारे केली जाणारी निःस्वार्थ मदत खरेखरच प्रेरणादायी आहे.

## मंदिरात लग्न करून लैंगिक अत्याचार

**पनवेल :** पनवेल परिसरात राहणाऱ्या एका २४ वर्षीय तरुणाने १६ वर्षीय अल्पवयीन मुलीसोबत प्रेमसंबंधातून मंदिरात लग्न करून लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. कर्जत पोलिसांनी याप्रकरणी २४ वर्षीय तरुणाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तसेच सदरचा गुन्हा पुढील तपासासाठी पनवेल शहर पोलिसांकडे वर्ग केला आहे. हा तरुण पनवेलमधील करंजाडे भागात राहण्यास आहे. वर्षभरापूर्वी त्याने पीडित मुलीसोबत मैत्री करून तिच्यासोबत प्रेमसंबंध निर्माण केले. त्यानंतर पीडित मुलीसोबत मंदिरात लग्न करून तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्याने गेल्या जानेवारी ते मार्च २०२५ या कालावधीत तिला त्याच्या घरी नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. या प्रकरातून ती गरोदर राहिली. गेल्या आठवड्यात पीडित मुलीच्या कुटुंबियांना ही बाब समजल्यानंतर त्यांनी कर्जत पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी या तरुणावर गुन्हा दाखल केला. आता हा गुन्हा पनवेल शहर पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला आहे.



## मुख्याधिकाऱ्यांच्या शब्दभंगाविरोधात उपोषण

**। उरण । प्रतिनिधी ।**

१५ वर्षांपासून नगर परिषदेसाठी जीवाची पर्वा न करता काम करणारे आणि कोविड महामारीत प्राणाची बाजी लावून सेवा बजावणारे आदिवासी, दलित, गोरगरीब सफाई कंत्राटी कामगार आता रस्त्यावर उतरले आहेत. उरण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी समीर जाधव यांनी दहा महिन्यांपूर्वी दिलेला शब्द पाळला नाही. कामगारांच्या हक्कांच्या मागण्या फक्त कागदावरच राहिल्या. त्याच्या निषेधार्थ बेमुदत उपोषण गुरुवारपासून सुरू आहे.

पोटाची खळगी भरण्याऐवजी आम्हाला उपाशी ठेवण्याचा कट सुरू आहे, अशा संतप्त भावना व्यक्त करत, म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनतर्फे दि.१४ ऑगस्टपासून उरण नगरपरिषद प्रवेशद्वारासमोर आमरण उपोषणाचा बिगुल वाजवण्यात आला आहे. युनियनचे अध्यक्ष ॲड. सुरेश ठाकूर आणि सरचिटणीस अनिल जाधव यांच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या या लढ्याने उरण नगरपरिषद प्रशासनाची झोप उडाली आहे.

याबाबत नगरपालिका प्रशासनाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.



## बॉम्बे डाइंगतर्फे रक्तदान शिबीर

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनी पाताळगंगा औद्योगिक परिसरातील बॉम्बे डाइंग अ‍ॅण्ड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, पाताळगंगा युनिटतर्फे समर्पण ब्लड सेंटर यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन गुरुवार, दि. १४ ऑगस्ट रोजी करण्यात आले होते. हा उपक्रम कंपनीच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीच्या अंतर्गत राबविण्यात आला. यामागील प्रमुख उद्देश म्हणजे आपत्कालीन परिस्थितीत कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक रक्तसाठा उपलब्ध ठेवणे.

या शिबिराचे उद्घटन कंपनीचे उपाध्यक्ष (उत्पादन) बी. पी. मिश्रा यांच्या हस्ते करण्यात आले. कंपनीच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांसह सोमेश्वर काळे महाव्यवस्थापक (कार्मिक व प्रशासन) आणि त्यांची मानव संसाधन टीम यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मेहनत घेतली. या शिबिराला कर्मचाऱ्यांनी दिलेला प्रतिसाद अत्यंत उत्स्फूर्त होता. १०० हून अधिक कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून सामाजिक जबाबदारीची जाण दाखवली.

## वैभव बियर शॉपीमध्ये चोरी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यातील शिरढोण गावाच्या हद्दीत असलेल्या वैभव बियर शॉपीमध्ये अज्ञात चोरट्यांनी चोरी करून रोख रकमेसह बियरच्या बाटल्या व रेडबुलचे कॅन असा मिळून जवळपास २२ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. अज्ञात चोरट्याने वैभव बियर शॉपीचे शटर कोणत्यातरी हत्याराने उचकटून आत प्रवेश करून दुकानातील रोख रकमेसह बियरच्या बाटल्या व रेडबुलचे कॅन असा मिळून जवळपास २२ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## आर्थिक साक्षरता, डिजिटल फसवणुकीचे धडे

■ मुलींना ५० सायकल वाटप, तर शाळेला पाच लाखांची मदत
■ स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेची सामाजिक बांधिलकी




**। खोपोली । प्रतिनिधी ।**

आर्थिक साक्षरता आणि डिजिटल फसवणूक रोखण्यासाठी जागरूकता शिबिराचे स्टेट बँक ऑफ इंडिया क्षेत्रीय व्यवसाय कार्यालय पनवेल यांच्यावतीने खोपोलीत समर्थ मंगल कार्यालयात गुरूवार, दि.१४ ऑगस्ट रोजी आयोजन करण्यात आले होते.

बँकेचे चेअरमन सी.एस.शेट्टी यांच्या उपस्थितीत मुद्रा कर्ज वाटप, सीएसआर फंडातून शांतीनगरमधील मराठी शाळेला पाच लाखांची मदत तसेच चिलठण हायस्कूलमधील विद्यार्थिनींना सायकलचे वाटप करण्यात आले. तसेच आपल्या बँक खात्यासंबंधी गोपनीय माहिती कोणाला देऊ नका कोणतेही माहिती हवी असल्यास जवळच्या बँक शाखेत संपर्क साधा, असे आवाहन चेअरमन सी.एस. शेट्टी यांनी केले.

स्टेट बँक ऑफ इंडिया क्षेत्रीय व्यावसाय कार्यालय पनवेल यांनी कार्यक्रमाचे आयोजन खोपोली शहरात केले होते. या कार्यक्रमासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाचे चेअरमन सी.एस.शेट्टी, चीफ जनरल मॅनेजर मुंबई मेट्रो मंजू शर्मा, डीएमडी अरविंद सिंग प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी एसबीआय डीजीएम पूर्व मुंबई नवीन मिश्रा, एसबीआय प्रादेशिक व्यवस्थापक पनवेल सूर्यजीत सिंग, मुख्य व्यवस्थापक एसबीआय खोपोली शाखा मुकेश कुमार, खालापूर पंचायत समितीचे मा.सदस्य, ग्रामपंचायतींचे सरपंच, सदस्य,महिला बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जीवन गती विमा वाटप, मुद्रा कर्ज वाटप, सीएसआर फंडातून शांतीनगरमधील मराठी शाळेला पाच लाखांची मदत तसेच चिलठण हायस्कूलमधील विद्यार्थिनींना सायकलचे वाटप करण्यात आले. आदर्श महिला बचत गट, दत्तकृपा विघ्नहर्ता महिला बचत गट, शिवसमर्थ, पंचशील गावदेवी तसेच मावळ तालुक्यातील आदर्श सरपंच लक्ष्मण ढाकू पारखे कान्हे ग्रामपंचायत गणेश तुकाराम भानुसारे सरपंच यांचाही सन्मान करण्यात आला.

## रस्त्यावरील खड्ड्यांमुळे कामोठेवासियांचे हाल

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कामोठे वसाहतीमध्ये अनेक रस्त्याला पडलेल्या खड्ड्यांमुळे कामोठेवासियांना श्वसनाचा त्रास होऊ लागला आहे. या नागरी प्रश्नावर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष आक्रमक झाला असून, तातडीने पनवेल महानगरपालिकेने रस्ते दुरूस्ती करून देण्याची मागणी संबंधित अधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

यासंदर्भात कामोठे शिवसेना शहर प्रमुख रामदास गोवारी, उपशहर प्रमुख सचिन मनोहर त्रिमुखे यांनी पनवेल महानगरपालिकेचे प्रभाग अधीक्षक दशरथ भंडारी याना निवेदन देऊन त्यात त्यांनी म्हटले आहे की, पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती क कामोठेमधील मानसरोवर स्टेशनपासून से. ०६ महामार्गापर्यंत रस्ते दुरूस्ती कामे चालू होते, परंतु दुरूस्तीची कामे अपूर्ण स्थितीत ठेवले असल्याने रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. मातीमुळे धूळ तयार होऊन नागरिकांना श्वसनाचा त्रास होत आहे. वाहतूक कोंडी होत आहे, त्यामुळे लवकरात लवकर रस्त्यांची दुरूस्ती करण्यात यावी अन्यथा शिवसेना रस्त्यावर उतरून एक दिवसीय लक्षणीय उपोषण आणि अंदोलन छेडेल, असा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

## मोटारसायकलीच्या अपघातात चालकाचा मृत्यू

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलजवळील जेएनपीटी हायवे क्रमांक ३४८ च्या मार्गावर मोटारसायकल चालकाने भरधाव वेगाने मोटारसायकल चालवून केलेल्या अपघातात चालकाचा मृत्यू झाला असून, सहकारी जखमी झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मयूर कळसकर (२५) रा. पुणे, याने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल पनवेलजवळील जेएनपीटी हायवे क्रमांक ३४८ च्या मार्गावर भरधाव वेगाने चालवून रस्त्याच्या दुभाजकाला धडकून झालेल्या अपघातात तो जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला आहे. तर, त्याचा सहकारी विनायक तिलाखे (२५) रा. पुणे हा जखमी झाला आहे.

## सायन-पनवेल मार्गावरील भुयारी मार्ग बंद

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

सायन-पनवेल महामार्गाच्या कामादरम्यान पादचाऱ्यांच्या सोईसाठी भुयारी मार्ग बांधण्यात आला होता. अखेर १२ वर्षांनी हा भुयारी मार्ग कायमचा बंद करण्यात आला आहे. चुकीच्या पद्धतीने बांधकाम करण्यात आल्याने हे मार्ग बंद करण्यात येत असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देण्यात आली आहे.



१२ वर्षांपूर्वी सायन-पनवेल महामार्गाच्या विस्तारीकरणाचे काम हाती घेण्यात आले होते. तत्कालीन सरकारने हा महामार्ग आठ पदरी करण्याचा निर्णय घेतल्याने चेंबूर बीएआरसी ते कळंबोलीपर्यंत विस्तार करण्यात आलेल्या मार्गांवर रस्ता ओलांडणाऱ्या पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून १८ ठिकाणी भुयारी मार्ग बांधण्यात आले होते. महामार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर पादचाऱ्यांसाठी बांधण्यात आलेल्या या मार्गात अनेक समस्या निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले. भुयारी मार्गात गळती लागून मोठ्या प्रमाणात पाणी साठल्याने पादचाऱ्यांना भुयारी मार्गाचा वापर करता आला नाही. नागरिकांनी याबाबत तक्रारी केल्यानंतर नियोजन फसलेले भुयारी मार्ग नियमित चालू करण्यास बांधकाम विभागाला अपयश आले. अखेर १२ वर्षांनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील सर्वच्या सर्व भुयारी मार्ग जमीनदोस्त करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**पान १ वरून**

## जिल्ह्याचे बालस्वास्थ्य बिघडले

जिल्ह्यातील चार लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यास अडचणी निर्माण झाल्याने बालस्वास्थ्य बिघडण्याचे चित्र आहे.

अंगणवाडीतील बालकांसह शाळा, महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करून, त्यांना निरोगी जीवनशैली जगता यावे, यासाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य योजना सुरु करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची तपासणी करून त्यांच्यावर मोफत उपचार व शस्त्रक्रिया केली जाते. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम विद्यार्थ्यांना आरोग्य सेवा आणि सुविधा पुरवण्यासाठी एक महत्त्वाची योजना मानली जाते. या योजनेत शून्य ते १८ वयोगटातील मुला-मुलींच्या आरोग्याची तपासणी केली जाते. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम भारत सरकारचा एक उपक्रम आहे. शाळा-महाविद्यालयांतील मुला-मुलींची शारीरिक तपासणी, डोळे, कान, नाक, घसा, त्वचा आणि इतर आरोग्य समस्यांची तपासणी नियमित केली जाते. तपासणीमध्ये आढळलेल्या आरोग्य समस्यांवर औषधोपचार, शस्त्रक्रिया किंवा इतर आवश्यक उपचार केले जातात. वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, औषध निर्माता व औषधांचा साठा वाहनांद्वारे घेऊन शाळांमध्ये हा कार्यक्रम राबविला जात होता. मुंबई येथील दत्तगुरू ट्रॅव्हल्स या कंपनीला गाड्या पुरविण्याचा राज्यस्तरीय ठेका दिला होता. या ट्रॅव्हल्समार्फत वाहनांचा पुरवठा केला जात होता. शाळा, अंगणवाडी, महाविद्यालयात या गाड्यांद्वारे जाऊन वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत विद्यार्थ्यांची तपासणी केली जात होती.

रायगड जिल्ह्यातील अंगणवाडी व शाळांमध्ये जाऊन चार लाख विद्यार्थ्यांची तपासणी केली जात होती. त्यामुळे विद्यार्थ्यांचे स्वास्थ्य राखण्यास मदत झाली होती. परंतु, या एजन्सीला आता जुन्या दराने वाहनांचा पुरवठा करणे परवडत नाही. त्यामुळे मार्च महिन्यापासूनच कंपनीने वाहनांचा पुरवठा करणे बंद केले आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील अंगणवाडी, शाळा, महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी होण्यास अडथळा निर्माण झाला आहे. वाहने उपलब्ध नसल्याने डॉक्टरांना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचता येत नाही. त्यामुळे जिल्ह्यातील बालस्वास्थ्य योजना बिघडली असल्याचे चित्र आहे. जिल्ह्यातील शाळा सुरु होऊन दोन महिने होत आली आहेत. मात्र, अजूनपर्यंत काही दूरच्या शाळा, अंगणवाड्यांपर्यंत अधिकारी पोहोचले नसल्याची माहिती समोर आली आहे. रायगड जिल्ह्यात चार हजार अंगणवाड्या असून, जिल्हा परिषद, माध्यमिक, उच्च माध्यमिकच्या तीन हजारांहून अधिक शाळा, महाविद्यालये आहेत. या शाळेतील चार लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचताना अडथळा निर्माण झाला आहे.

**विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी भारत सरकारकडून राष्ट्रीय बाल स्वास्थ उपक्रम राबविला जात आहे. या माध्यमातून अंगणवाडी, शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जाते. लांब पल्ल्यातील शाळा, अंगणवाड्यांना भेटी देण्यासाठी जिल्हास्तरावर नियोजन करण्याच्या सूचना शासनाकडून आल्या आहेत. त्याची प्रक्रिया सुरु आहे. दहा ते पंधरा दिवसांत निविदा प्रक्रिया पूर्ण करून नियमित आरोग्य सेवा शाळांमध्ये दिल्या जातील.**

**– डॉ. निशिकांत पाटील,**
**जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड**

## नागावच्या शाळेत स्काऊड गाईड युनिट

मंगेश नाईक, शुभम नाईक, निलेश नाईक, शाळेतील शिक्षक जान्हवी बनकर, चंद्रकांत गिरी, मोहन पाटील, मंजुषा पाटील, सुप्रिया पाटील, वर्षा पाटील, तनिष्का नाईक आदी मान्यवरांसह शाळेतील विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. संस्थेचे सभासद विश्वजीत जोशी यांनी स्काऊड गाईडचे महत्त्व सांगत गावाचे, देशाचे नावलौकिक करण्याचे आवाहन आपल्या अध्यक्षीय भाषणातून केले. यावेळी कृषीवलच्या कार्यकारी संपादक माधवी सावंत व इतर मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

**चित्रलेखा पाटील यांचे कार्य कौतुकास्पद : हर्षदा मयेकर**

शेकापच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या पुढाकाराने नागाव हायस्कूलमधील विद्यार्थ्यांसाठी स्काऊडचे गणवेश उपलब्ध झाले आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांना स्काऊडचे धडे मिळणार आहेत. त्याचा आनंद आहे. शहीद निलेश तुणतुणे यांच्या स्मृती दिनानिमित्त मानवंदना देण्यासाठी नागाव हायस्कूलमध्ये एक चांगले युनिट निर्माण व्हावे, यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. समाजसेवेचा ध्यास असलेल्या शेकापच्या नेत्या चित्रलेखा पाटील यांचे कार्य खऱ्या अर्थाने कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर यांनी केले.

**चित्रलेखा पाटील यांचा आदर्श घेण्यासारखा : जान्हवी बनकर**

स्काऊड हा शिस्तीचा विषय आहे. आपल्या शाळेतील मुलांना स्काऊड गाईडचे धडे दिले जाणार आहे. हा एक विषय शाळेमध्ये ठेवला जाणार आहे. विद्यार्थ्यांना स्काऊडचे गणवेश देण्यासाठी शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी पुढाकार घेतला. एका दिवसातच नागाव शाळेतील विद्यार्थ्यांना स्काऊडचे गणवेश उपलब्ध करून दिले. त्यामुळे आता शाळेच्या मैदानात स्काऊडद्वारे संचलन होताना दिसणार आहे. शिक्षणाला महत्त्व देणाऱ्या चित्रलेखा पाटील यांचा आदर्श घेण्यासारखा आहे. त्याची जाण ठेवून विद्यार्थ्यांनी अधिक चांगल्या पद्धतीने स्काऊडचे धडे घेऊन एक शिस्तबद्ध नागरिक बनण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन शिक्षिका जान्हवी बनकर यांनी केले.

## उद्या शेकापच्या दहीहंडीचा थरार

दहीहंडी स्पर्धेसाठी ५३ गोविंदा पथकाने नोंदणी केली आहे. त्यात महिला गोविंदा पथक २५ आणि पुरुष गोविंदा पथक २८ आहेत. दहीहंडी फोडणाऱ्या पुरुषांच्या अंतिम विजेत्या पथकाला प्रथम क्रमांकाचे रोख एक लाख ३१ हजार १११ रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. पुरुष पथकाच्या पाच थरांच्या सलामीला पाच हजार रुपये, सहा थराच्या सलामीला अकरा हजार रुपये देण्यात येणार आहे. अंतिम विजेत्या महिला गोविंदा पथकाला प्रथम क्रमांकाचे ५१ हजार १११ रुपये व चषक असे बक्षीस देण्यात येणार आहे. तसेच चार थरांची सलामी देणाऱ्या महिला गोविंदा पथकाला पाच हजार रुपये व पाच थरांची सलामी देणाऱ्या पथकाला अकरा हजार रुपये देऊन सन्मानित केले जाणार आहे.

दहीहंडी उत्सवानिमित्त रिल्स स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पर्धेसाठी ३३ जणांनी नोंदणी केली असल्याचे सांगण्यात आले. अलिबाग नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा स्व. नमिता नाईक यांच्या स्मरणार्थ यावर्षी विशेष पारितोषिकांचे आयोजन करण्यात आले आहे. अलिबाग नगरपरिषद हद्दीतील पुरुष गोविंदा पथकाने दहीहंडी फोडल्यास त्या पथकाला एक लाख रुपये आणि महिला गोविंदा पथकाला ५० हजार रुपयांचे अतिरिक्त पारितोषिक देण्यात येणार आहे.

## महिला बेपत्ता

**। पनवेल । प्रतिनिधी ।**



राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक महिला कुठेतरी कोणास काहीएक न सांगता निघून गेली आहे. याबाबतची तक्रार कळंबोली पोलीस ठाणे येथे देण्यात आली आहे.

कळंबोली वसाहत मध्ये राहणारी पूजा सचिन धारणकर, २५ वर्षे, उंची ५.३, केस काळे, नाक सरळ, अंगाने मध्यम, डोळे काळे, अंगावर नेसून गुलाबी रंगाचा टॉप व सफेद रंगाची जीन्स, पायात सॅन्डल, बोली भाषा मराठी, हिंदी बोलते. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कळंबोली पोलीस ठाणे किंवा पोहवा सचिन हराळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ**
**विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, रा.प. रायगड विभाग, रामवाडी, पेण.**
e-mail-dest_raigad@rediffmail.com
दूरध्वनी क्र. ८२७५०६६४००

क्र.राप/रायगड/वाह/वाणिज्य/ ५९१ दिनांक :- १४/०८/२०२५

**स्वारस्य अभिव्यक्ती सुचना क्र.०२/२०२५**

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रायगड विभाग, पेण रामवाडी हे या विभागामार्फत मुंबई-गोवा व गोवा-मुंबई या राष्ट्रीय/राज्य महामार्गावरील खारपाडा ते कशेडी व कशेडी ते खारपाडा या हद्दीतील हॉटेल मोटेलच्या ठिकाणी रा.प.बसेसना अधिकृत थांबा देण्याबाबत विचाराधीन आहे. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मार्गाचे नाव | किमान अपेक्षित थांबा देकार रक्कम (प्रतिबस प्रतिदिन प्रमाणे) | | | थांबा आकार रक्कमेवर वस्तु व सेवाकर | प्रस्ताव सादर करताना भरणा करावयाची बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | साधी बस | निमआराम हिरकणी बस | वातानुकूलित व इतर सर्व प्रकारच्या बस | | |
| १. | मुंबई - गोवा | रू.१६०/- | रू.१५०/- | रू.२००/- | प्रत्येकी १८ टक्के | रू.१,००,०००/- |
| २. | गोवा- मुंबई | रू.२२०/- | रू.२००/- | रू.२८०/- | प्रत्येकी १८ टक्के | रू.१,००,०००/- |

अधिकृत हॉटेल थांब्यासाठी उपरोक्त प्रमाणे प्रतिदिन प्रतिबस/प्रतिफेरी किमा अपेक्षित देकार रक्कम निश्चित करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने अपेक्षित किंवा त्यापेक्षा थांबा देकार रक्कम देऊ करणाऱ्या हॉटेल चालक-मालक यांनी सदरची रक्कम स्वारस्य अभिव्यक्ती सुचना निविदा प्रपत्रात नमुद करून सदरचे निविदा प्रपत्र हॉटेल प्रस्तावासोबत सादर करण्यात यावेत.

निविदा प्रपत्राचे फॉर्म, अटी व शर्ती फॉर्म तसेस प्रस्तावाच्या सोबत आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी इत्यादी तपशिल विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रायगड, पेण रामवाडी येथे दि. १५.०८.२०२५ ते दि.२८.०८.२०२५ या कालावधीत दररोज शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवस सोडून इतर दिवशी १०.३० ते १५.०० या वेळेत हॉटेल थांबा प्रस्ताव सादर करणेकरीता रू.२०००/- + १८% वस्तु व सेवाकर असे एकूण रू.२,३६० /- परतावा केला जाणार नाही. व बयाणा रक्कम रू.१,००,०००/- या कार्यालयाकडे भरणा केले नंतर आपणांस निविदा प्रपत्र फॉर्म मिळतील. दि.२८.०८.२०२५ रोजी १५.०० वाजेपर्यंत निविदा प्रपत्र फॉर्म व बयाणा रक्कम स्विकारणेत येईल. दि. २८.०८.२०२५ रोजी १५.०० वाजल्या नंतर निविदा फॉर्म दिले जाणार नाहीत, तसेच बयाणा रक्कम स्विकारली जाणार नाही.

हॉटेल प्रस्ताव स्विकारण्याची शेवटची दिनांक २९.०८.२०२५ रोजी १४.०० वाजेपर्यंत राहील व निविदा प्रपत्र पेटी सिल केल्यानंतर उशिरा प्राप्त झालेले प्रस्ताव निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येतील. अपूर्ण नोंदी असलेल्या स्वाक्षरी नसलेल्या व आवश्यक मुळ कागदपत्रे निविदा सोबत न जोडल्यास निविदा अपात्र समजण्यात येईल. निविदा शक्यतो दि.२९.०८.२०२५ रोजी १५.३० वाजे पर्यंत उघडण्यात येतील.

सही/-
**विभाग नियंत्रक,**
**रा.प.रायगड विभाग, पेण**

## शिवशाही, स्लीपर कोचमुळे

# खिशाला कात्री

### लालपरी सुरू करण्याची प्रवाशांची मागणी

समीर रिसबूड

| श्रीवर्धन |

गेल्या काही दिवसांपासून श्रीवर्धन आगाराकडून मुंबई विभागाकडे जाणाऱ्या बसेसची संख्या कमी करण्यात आली आहे. मुंबईकडे मार्गस्थ होत असणाऱ्या अनेक बसेसपैकी साध्या गाड्या बंद करून त्या ठिकाणी वातानुकूलित शिवशाही व प्रवासासाठी आधुनिक तंत्रज्ञान व अधिक सुखसोयींनीयुक्त अशी विनावातानुकूलित स्लीपर कोच सोडण्यात येत आहेत. मात्र, प्रवाशांच्या सुखसोयीसाठी सुरू करण्यात आलेल्या बसेसच्या भरमसाठ तिकीट दरांमुळे प्रवाशांच्या खिशाला कात्री बसली असून, या मार्गावर साध्या बसेस सोडण्यात याव्यात, अशी मागणी श्रीवर्धन तालुक्यातील प्रवाशांनी केली आहे.

श्रीवर्धन स्थानकातून मुंबई, नालासोपारा, बोरीवली आणि पुणे या मार्गावर अनेक वर्षे साध्या बसेस सोडण्यात येत होत्या. राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांना चांगल्या दर्जाची सुविधा मिळावी या उद्देशाने २०१७ सालात शिवशाही बससेवा सुरू केली आणि स्लीपर कोच बस सेवा २०१९ सालात सुरू करण्यात आली. श्रीवर्धन आगाराकडे आधुनिक बसेस उपलब्ध झाल्यावर या मार्गावरील काही साध्या बसेस बंद करून त्या ठिकाणी शिवशाही व स्लीपर कोच बसेस सुरू करण्यात आल्या. साध्या बसच्या तुलनेत स्लीपर कोच बसच्या माध्यमातून राज्य परिवहनला प्रतिकिलोमीटर सत्तावीस रुपयांचे उत्पन्न मिळते. शिवशाही बसचे हे उत्पन्न प्रतिकिलोमीटर सत्तेचाळीस रुपये इतके आहे. राज्य परिवहन मंडळाच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होत असली सामान्य प्रवाशांना याचा फटका बसत आहे.

शिवशाही बसची वातानुकूलित यंत्रणा सुरू झाल्यावर गाडीचा वेग कमी होतो.श्रीवर्धन तालुक्यातील अनेक रस्ते हे घाट रस्ते आहेत. घाटात बस योग्य वेगात चढण्यासाठी वातानुकूलित यंत्रणा काही वेळासाठी बंद करावी लागते, वातानुकूलित यंत्रणा बंद केल्यास प्रवासी वर्ग उकाड्याने घामाघूम झाल्यावर चालकाला प्रवाशांच्या रोषाला सामोरे जावे लागते. स्लीपर कोच बसेसचे अनेक पंखे बंद, आसनांची दुरवस्था यामुळे प्रवाशांना जास्त तिकीट भाडे देऊनसुद्धा प्रवासाचे समाधान मिळत नाही.



**बसेसचे तिकीट दर**

**श्रीवर्धन मुंबई**
- साधी गाडी.३३८/-
- स्लीपर ४४३/-
- शिवशाही ४८७/-

**श्रीवर्धन बोरिवली**
- साधी गाडी.३५८/-
- स्लीपर ४१२/-
- शिवशाही ५३१/-

**श्रीवर्धन नालासोपारा**
- साधी गाडी.४१८/-
- स्लीपर ५५६/-

# भ्रष्ट माशांचा बाजार!

### मत्स्यव्यवसाय विभागाला पत्रकारांचा धसका



| उरण | प्रतिनिधी |

मत्स्यव्यवसाय विभागात भ्रष्टाचाराची दुर्गंधी एवढी पसरली आहे की, नियम, कायदे आणि बंदी काळ या मंडळींसाठी फक्त कागदावरचे शोभेचे फिती आहेत. उरण तालुका मराठी पत्रकार संघ गेल्या अनेक महिन्यांपासून पावसाळी मासेमारी बंदी काळातील बेकायदेशीर मासेमारी व विभागातील भ्रष्ट कारभाराविरोधात आवाज उठवत आहे. पण, विभाग मात्र 'कानात तेल, डोळ्यांवर पट्टी' लावून बसला आहे, असा आरोप स्थानिक मच्छिमारांकडून करण्यात येत आहे.

या निष्क्रिय व भ्रष्ट कारभाराविरोधात संघाने १५ ऑगस्ट रोजी मुंबई येथील मत्स्यव्यवसाय विभाग मुख्यालयासमोर उपोषणाचा इशारा दिला होता. इशाऱ्याचा फटका बसताच आयुक्त किशोर तावडे यांनी तातडीची बैठक बोलावून 'तक्रारींवर त्वरित कारवाई करू', असे आश्वासन दिले. उपोषण स्थगित करण्याची विनंती विभागाने केली आणि पत्रकार संघाने त्यांचा मान राखून १५ दिवसांची मुदत दिली. मात्र, हा वेळ गोड बोलून वेळ मारून नेण्यासाठी नाही, तर भ्रष्ट माशांच्या बाजारावर हातोडा मारण्यासाठी आहे, हे संघाने स्पष्ट केले

पत्रकार संघाच्या तक्रार अर्जानुसार संजय पाटील सहाय्यक आयुक्त, सुरेश बागुलगावे उरण परवाना अधिकारी, प्रदीप नाखवा चेअरमन, करंजा मच्छिमार सोसायटी यांच्यावर तात्काळ कारवाई, मयताच्या नातेवाईकांना भरपाई आणि इतर सर्व तक्रारींवर कार्यवाहीसह अहवाल पत्रकार संघाला देणे हीच लोकशाहीतील खरी कसोटी असेल. आयुक्त किशोर तावडे यांनी योग्य ती आणि ठोस कारवाई केली नाही, तर उरण तालुका मराठी पत्रकार संघ पुन्हा एकदा उपोषणाचे हत्यार धारदार करून मैदानात उतरेल, असा इशारा संघाचे अध्यक्ष घनःश्याम कडू यांनी दिला.

# खांदा वसाहतीत कुत्र्यांचा धुमाकूळ

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल खांदा वसाहत परिसरात मोकाट कुत्र्यांचा त्रास दिवसेंदिवस वाढत असून, महिला व लहान मुलांच्या सुरक्षेवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मागे लागून त्यांना घाबरवण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. अनेकांना कुत्र्यांनी चावा घेतला असून काहीजण गंभीर जखमी झाल्याच्या घटना नोंदल्या गेल्या आहेत. स्थानिक नागरिक भीतीच्या छायेत जीवन जगत असून, पनवेल महानगरपालिकेने अद्याप ठोस कारवाई न केल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

भटक्या कुत्र्यांना खायला टाकणाऱ्यांचीही चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी होत आहे.






# पाकिस्तानचे फुत्कार

भारत आणि पाकिस्तानचे स्वातंत्र्यदिन एकामागोमाग येतात. १९४७ मध्ये कालपर्यंत एकाच देशाचा भाग असलेले लोक एका दिवसात वेगवेगळ्या देशांचे नागरिक आणि एकमेकांचे जणू दुश्मन झाले. त्या घटनेला आज ७८ वर्षे लोटली. तरीही तीच स्थिती कायम आहे. फरक इतकाच की, तेव्हा साम्राज्य असलेल्या ब्रिटिशांची पाकिस्तानला फूस व मदत होती. आता अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांच्या पाठिंब्याने पाकिस्तानची टूरटूर चालू आहे. गेली काही वर्षे पाकिस्तानची आर्थिक स्थिती अत्यंत वाईट होती. कोणत्याही क्षणी दिवाळे निघेल अशी अवस्था होती. मध्यंतरी तर तांदूळ पाचशे रुपये किलो, कांदेबटाटे तीनशे रुपये किलो असे भाव तेथे चालू होते. भिकाऱ्यांची संख्या अतोनात वाढली होती. त्यापूर्वी ओसामा बिन लादेनला पाकिस्तानने आश्रय दिल्याचे उघड झाल्याने अमेरिकेची मर्जी फिरली होती. अमेरिकेने पैसे देणे बंद करून टाकले. पण ट्रम्प आल्यानंतर पाकिस्तानचे दिवस पुन्हा पालटले आहेत. त्यामुळे देशाबाहेरच्या भानगडी करायला पाकिस्तानी लष्कर व सरकार यांना पुन्हा अवसर मिळू लागला आहे. पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर हे भारताविरुध्द विषारी फुत्कार टाकू लागले आहेत. गेल्या आठवड्यात अमेरिकेतील पाकिस्तानी लोकांच्या मेळाव्यात त्यांनी गुजरातच्या जामनगरमधला रिलायन्सचा तेलशुध्दीकरण कारखाना आपण उडवून देऊ शकतो असे सांगितले. त्यापूर्वी काही दिवस अगोदर त्यांनी काश्मिरातील इंडस नदीवरील धरणावर अणुबॉंब टाकण्याची धमकी दिली होती. हा एकाच वेळी अत्यंत गंभीर आणि तितकाच मूर्ख हास्यास्पद प्रकार आहे. काश्मिरात अणुबॉंब टाकला तर त्याचे जितके भयंकर परिणाम भारतावर होतील तितकेच ते पाकिस्तानात आणि इस्लामाबादवरही होतील हे मुनीर विसरत आहेत. अणुबॉंबनंतरचा किरणोत्सर्ग व हानी ही देशाच्या सीमा पाहून होत नसते. जपानमध्ये हिरोशिमामध्ये अणुबॉंबने लाखो लोक मेले वा अपंग झाले. त्यानंतरच्या अनेक पिढ्या किरणोत्सर्गाने बरबाद झाल्या. तीच स्थिती काश्मीरप्रमाणे मुनीर यांच्या पाकिस्तानचीही होईल. पण भारत-द्वेषाने ते इतके आंधळे झाले आहेत की आपण काय बोलतो आहोत याचे त्यांना भान नाही.

## मुनीर यांचा आगखाऊपणा

पाकिस्तानात सरकार कोणाचेही असले तरी तिथली खरी सत्ता लष्कराच्याच हातात असते. लष्करप्रमुख हा सर्वसत्ताधीश असतो. हे सर्वच लष्करप्रमुख भारताचे द्वेष करणारे असतात. किंबहुना, भारतद्वेषाच्या आधारे पाकिस्तानी जनतेचा पाठिंबा त्यांना मिळत असतो. त्याच्याच आधारे देशात कितीही लोक भुकेकंगाल आणि बेरोजगार होऊन मेले तरी जनता त्याबद्दल बोलत नाही. एकेकाळी पाकिस्तानचे पंतप्रधान भुट्टो यांनी आकाशात चंद्रसूर्य असेपर्यंत पाकिस्तान भारताशी लढत राहील असे म्हटले होते. नंतर आलेले जनरल झिया आणि परवेझ मुशर्रफ यांनी तीच भावना जोपासली. पण असीम मुनीर हे या सगळ्यांच्याही पलिकडे गेले आहेत. एप्रिल महिन्यात त्यांनी, हिंदू आणि मुसलमान हे एकत्र राहू शकत नाहीत व त्या आधारे आपल्या पूर्वजांनी केलेली फाळणी अतिशय योग्य होती हे आपल्या मुलांना नीटपणे शिकवायला पाहिजे अशी भाषा केली होती. त्यानंतर पाचच दिवसांनी पहलगामचा हल्ला झाला होता. मधल्या काळात पाकिस्तानला असलेला ट्रम्पचा पाठिंबा आणखीनच वाढला आहे. एकीकडे भारत पहलगाम हल्ल्याल पाकिस्तानला जबाबदार धरत असताना, अमेरिका मात्र पाकिस्तानची पाठराखण करण्याच्या आपल्या जुन्या वळणावर गेल्याचे दिसत आहे. ट्रम्प यांनी सर्वच क्षेत्रात सर्वच मर्यादा पार केल्या आहेत. त्यामुळे त्यांनी जून महिन्यात मुनीर यांना वॉशिंग्टनमध्ये आपल्या घरी खास मेजवानीसाठी आमंत्रित केले. मुनीर हे केवळ लष्करप्रमुख आहेत. पंतप्रधान किंवा राष्ट्रपती नाहीत. तरीही ट्रम्प यांनी त्यांना राष्ट्राध्यक्षांचा दर्जा देऊन शाही खातिरदारी केली. गेल्या ७८ वर्षात असे कधीही घडले नव्हते. इतकेच नाही तर मेजवानीनंतर ट्रम्प यांनी पाकिस्तान व अमेरिका हे कसे दोस्त आहेत याचे गोडवे गायले. त्यानंतर मुनीर गेल्या आठवड्यात पुन्हा अमेरिकेत गेले. त्यांनी तेथील लष्करप्रमुखांची भेट घेतली. याच दरम्यान ट्रम्प यांनी पाकिस्तानात मोठी गुंतवणूक करण्याचे जाहीर केले. तिथे तेलाच्या विहिरी खोदण्यासाठी अमेरिका मदत करील असे ते म्हणाले. इतकेच नाही तर भारताला खिजवण्यासाठी भविष्यात पाकिस्तान भारतालाही तेल विकू शकेल असे जखमेवर मीठ चोळले.

## मूर्ख ट्रम्पचा संधिसाधूपणा

ट्रम्प यांना मोदी सरकार व भारताला धडा शिकवायचा आहे. त्याची नक्की कारणे कोणालाही सांगता येत नाहीत. त्यात भारताच्या आडून रशियाला धडा शिकवण्याचा भाग असू शकतो. किंवा मोदींविषयी ट्रम्प यांचा काही वैयक्तिक राग असू शकतो. काही जणांच्या मते, अदानीचे अमेरिकेतील प्रकरण हे ट्रम्प यांच्या हातातले कोलित आहे. त्याच्याच आडून मोदींना आपण वाटेल ते करायला भाग पाडू शकतो असे ट्रम्प यांना वाटते. ही कारणे काहीही असली तरी पाकिस्तानची मग्रुरी यामुळे वाढली आहे ही सत्य बाब आहे. असीम मुनीर म्हणजे सुटाबुटातला लादेन असल्याचे वर्णन अमेरिकेतले माजी लष्करप्रमुख तसेच संरक्षण जाणकार करीत आहेत. पण ट्रम्प यांना या कशाचेच काही पडलेले नाही. ट्रम्प यांच्या कंपन्यांना पाकिस्तानात मोकाट धंदा करण्यास वाव मिळणार असल्याने ते पाकिस्तानला उचलून धरत आहेत असेही काही जण म्हणतात. ट्रम्प यांचा एकूण बालिशपणा पाहता ते सहज शक्य आहे. मात्र एक लष्करप्रमुख शेजारी देशाला अणुयुध्दाची धमकी देतो आणि अमेरिकेसह सर्व देश तरीही त्याला टाळ्या पिटून पाठिंबा देतात हे भयंकर चित्र आहे. मुनीर यांच्या या धोरणांमुळे या उपखंडात मोठा तणाव निर्माण होण्याचा धोका आहे. यात परस्पर भारताला शह मिळत असेल तर चीनदेखील अप्रत्यक्षपणे पाकिस्तानी कारवायांना मदत करण्याचा संभव आहे. ऑपरेशन सिंदूरच्या वेळी चीनच पाकच्या मदतीला धावून आला होता. थोडक्यात भारताची आज सर्व बाजूंनी कोंडी झाली आहे व पाकिस्तान त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न करीत आहे. रिलायन्सवर हल्ला करण्याचा मुनीर यांचा ताजा इशारा हा तर ट्रम्प यांना खूष करण्याचा बेशरम प्रयत्न आहे. कारण, रशियाकडून होणारी तेल आयात व रिलायन्ससारख्या कंपन्या स्वस्तात मिळणारे तेल शुध्द करून कमावत असलेला अब्जावधींचा नफा यावर खुद्द ट्रम्प यांनी दोन दिवसांपूर्वी भाष्य केले आहे. याच काळात अमेरिकेने बलुचिस्तानमधील फुटीर संघटनांना दहशतवादी घोषित केले आहे. त्यामुळे पाकिस्तानी सरकारला त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यास आणखी जोर येणार आहे. यामुळे पाकिस्तानी लष्कर आणि मुनीर यांच्यासारखे भंपक नेते यांची पकड मजबूत होणार आहे. पाकिस्तानातील सामान्य जनता अधिक कंगाल होईल. एकेकाळी आपलेच भाऊ असलेल्या व आपल्यासोबतच स्वतंत्र झालेल्या या देशाची ही स्थिती व भारताला त्यातून होणारा उपद्रव हा चिंताजनक आहे.

---

**विचार**

# विजयी विश्व तिरंगा प्यारा...

*मित्रहो, स्वातंत्र्य दिन हा खऱ्या अर्थानं आनंदोत्सव असतो. एक एक प्रगतीचे पाऊल पुढे टाकत आपण सर्वांनी स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा अर्थातच भारत देशाला स्वातंत्र्य प्राप्त होऊन ७८ वर्षे पूर्ण होताहेत, ही भारतीय जनमानसाला सुखद दिलासा देणारी गोष्ट आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळालं अन् ब्रिटिश राजवट संपुष्टात आली.पारतंत्र्याचा काळोख नाहिसा होऊन, भारतमातेच्या उदरातून स्वराज्याचा उष:काल उदयास आला. खरंतर, स्वातंत्र्यप्राप्तीसाठी शेकडो क्रांतीवीरांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिलं.त्यांच्या गोड स्मृती आमच्या हृदयात चिरकाल तेवत राहतीलच, हे सूर्य किरणाएवढं शुभ्र सत्य आहे.*



**रणवीरसिंह राजपूत**

गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य लढ्यात सर्वधर्मियांना सामावून घेऊन खिलाफत चळवळ, असहकार चळवळ, मिठाचा सत्याग्रह, करेंगे या मरेंगे, भारत छोडो ही जनआंदोलने छेडण्यात आली. त्यातूनच पुढे १५ ऑगस्ट हा सुवर्ण दिवस प्रकाशमान झाला. त्यामुळे आज प्रत्येक भारतीय स्वातंत्र्याचा मोकळा श्वास घेत आहे, ही क्रांतिकारकांची पुण्याईच म्हणावी! आज आपण सर्वजण स्वातंत्र्याची फळे चाखत आहोत, हे वास्तवात क्रांतिकारकांच्या त्यागाचं फलित आहे, ही गोष्ट प्रत्येक भारतीयाने आपल्या हृदयात कोरून ठेवावी. वास्तविक पाहता, स्वातंत्र्य दिन साजरा करणं म्हणजे ज्या शुरवीरांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या रक्ताचा अभिषेक केला, त्यांची आठवण करत त्यांना विनम्र अभिवादन करून त्यांचे गोडवे गाण्यासाठी तथा त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देश्याने १५ ऑगस्ट हा दिवस सर्वधर्मीय नागरिक दरवर्षी साजरा करीत असतात. चला तर, आपण सर्वजण एकसुराने बोलूया 'जय हिंद, जय हिंद, जय हिंद...'

भारतीय स्वातंत्र्याच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीयांना हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही नागरिकांना स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'हर घर तिरंगा' अभियान देशभर राबविण्यात आला आहे.

या अभियानाचा मुख्य उद्देश म्हणजे देशाप्रती राष्ट्रप्रेम, देशाभिमान, सार्वभौमत्व, एकात्मता, अखंडता, राष्ट्रीय तिरंगा झेंड्याचे पावित्र्य अन् महत्व हे सर्व भारतीयांच्या मनात खोलवर रुजविणे होय.

या धर्तीवरच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घरो घरी तिरंगा अभियानाच्या माध्यमातून सर्वधर्मीय नागरिकांनी/विद्यार्थ्यांनी आपापल्या घरांवर तिरंगा ध्वज फडकवावा अन् ध्वजा सोबतचा सेल्फी. या वेबसाईटवर अपलोड करून या अभियानात मोठ्या संख्येनं सामील व्हावं, असं आवाहन केलं आहे.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली कस्तुरबा गांधी, मादाम कामा, मोतीलाल नेहरू, डॉ. राजेंद्र प्रसाद, विजयालक्ष्मी पंडित, गोपाळ कृष्ण गोखले, जवाहरलाल नेहरू, कमला नेहरू, इंदिरा गांधी, लालबहादूर शास्त्री, सरोजनी नायडू, साने गुरुजी, वल्लभभाई पटेल, जयप्रकाश नारायण, विनोबा भावे, अरूणा आसफअली, यशवंतराव चव्हाण, बाबू गेनू, ठाण्याचे दत्ताजी ताम्हणे, नंदुरबारचे बाल क्रांतिकारक शिरीषकुमार मेहता, पश्चिम खान्देशचे दादासाहेब रावल, दादुसिंग राजपूत, धनाजी नाना चौधरी, त्यांच्या पत्नी सरस्वतीबाई चौधरी आदी असंख्य स्वातंत्र्यसेनानींनी अहिंसा व सत्याग्रहाच्या मार्गाने लढा देऊन ब्रिटिशांना 'भारत छोडो' हा निर्वाणीचा इशारा दिला.

तर दुसऱ्या बाजूने गोळीला गोळीने उत्तर देणाऱ्या जहालमतवादी क्रांतीवीर लोकमान्य टिळक, क्रांतिकारक भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, चंद्रशेखर आझाद, सुभाषचंद्र बोस, बटूकेश्वर दत्त, लाला लजपतराय, वासुदेव बळवंत फडके, स्वातंत्र्यवीर सावरकर, क्रांतिवीर नाना पाटील, सेनापती बापट, बिरसा मुंडा, मदनलाल धिंग्रा, चाफेकर बंधू, अनंत कान्हेरे, उमाजी नाईक, ठाणे येथील कोळी समाजाचे मारुतीराव ठाणेकर आदी जहाल क्रांतीकारकांनी फिरंग्यांना जेरीस आणले. सरतेशेवटी इंग्रजांना भारत सोडून जावे लागले. या लढ्यात काहींना वीरमरण आलं, तर काहींनी स्वातंत्र्यासाठी मोलाचं योगदान दिलं. अशाप्रकारे सामूहिक प्रयत्नांतून भारत देशाला स्वातंत्र्य मिळालं. अशा महान क्रांतिकारकांना आम्हा मराठी भूमिपुत्रांकडून त्रिवार मानाचा मुजरा

आता 'स्वराज्य' मिळालं, त्याचं 'सुराज्य' करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारने कंबर कसली आहे. मोदींच्या मार्गदर्शनाखाली देशातील सर्वधर्मीय गोरगरीब, निर्धन, निराधार, आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटक, अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर, कामगार यांचे आवास, शिक्षण, रोजगार, आरोग्य हे मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी ठोस योजना राबविल्या जात आहेत.

संकटग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात देऊन, त्यांना कर्ज माफ करणं, कृषीपंपाचे वीज बिल माफ करणे अन् कमी व्याज दराने कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी जलदगतीने पावलं उचलली जात आहेत. त्यामुळे बळीराजाला मोठा दिलासा मिळत आहे.

मोदीजींच्या संकल्पनेतून महिला सक्षमीकरणासाठी प्रधानमंत्री मुद्रा योजनेची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. याशिवाय प्रधानमंत्री मातृवंदना योजना, प्रधानमंत्री सुकन्या समृद्धी योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती योजना, प्रधानमंत्री उज्वला योजना, प्रधानमंत्री किसान मानधन योजना, प्रधानमंत्री ग्राम सिंचाई योजना, दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना, दीनदयाळ अंत्योदय योजना, आदर्श सांसद ग्राम योजना, मेक इन इंडिया, स्टार्ट अप, स्टँड अप इंडिया, जनधन योजना, स्वच्छ भारत योजना, स्मार्ट सिटी योजना, इज ऑफ डूइंग बिझनेस अशा विविध लोकोपयोगी योजना सामान्य माणूस हा केंद्र बिंदू मानून आतापर्यंत राबविण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर भारतीयांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकींमध्ये मोदींना पुनश्च पहिली पसंदी दर्शवून तिसऱ्यांदा पंतप्रधान होण्याचा मान दिला. हीच त्यांच्या कार्यकर्तुत्वाची खरी पावती आहे.

भारताची अंतराळातील शक्ती वाढविण्याच्या उद्देशाने 'चांद्रयान-२' ही महत्त्वाकांक्षी अंतराळ मोहीम मोदींनी यशस्वी करून दाखविली. त्यामुळे अशी व्यापक क्षमता असलेला भारत हा जगातील चौथा देश गणला गेला आहे. शेकडो वर्षांपासून मुस्लिम महिला ह्या 'तिहेरी तलाक' या जाचक कुप्रथेमुळे दुर्लक्षित-उपेक्षित जीवन जगत होत्या.त्यांच्या संरक्षणार्थ मोदींनी पार्लमेंटच्या माध्यमातून 'तिहेरी तलाक बंदी कायदा' देशात लागू केला. यास्तव मुस्लिम महिलांनी तथा तिहेरी तलाकपिडीत महिलांनी मोदींचे शतश: आभार मानले आहे. जम्मू-काश्मीरसंबंधीचे राज्यघटनेतील ३७० कलम रद्दबातल करून त्याचा स्वतंत्र दर्जा काढून घेतल्याने, आता तेथे भारतातील कुठलीही व्यक्ती वा कंपनी उद्योगधंदा करू शकते. मोदी सरकारच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे जम्मू काश्मीरचा औद्योगिक विकासाला चालना मिळत असून, तेथील बेरोजगार तरुणांच्या हातांना काम मिळू लागलं आहे. त्याची परिणती म्हणजे या राज्याच्या आर्थिक, औद्योगिक व पर्यटन विकासाला गती प्राप्त होऊन राज्याची आर्थिक स्थिती मजबूत होत आहे. याशिवाय ३५ अ कलम रद्द करून जम्मू काश्मीर आणि लडाख हे वेगवेगळे दोन केंद्रशासित प्रदेश नावरूपाला आले आहेत. याचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांच्या मुत्सद्देगिरीला जातं. पहलगाम तथा पाकिस्तान क्षेत्रात ऑपरेशन सिन्दुर व ऑपरेशन महादेव ह्या लष्करी कारवाया करून आतंकवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले, वास्तवात ही भारतीय सैनिकांच्या शौर्याची नांदी असून आझाद हिंदुस्थानाची ताकद आहे.

उल्लेखनीय गोष्ट म्हणजे मोदीजींच्या प्रभावशाली व पारदर्शक राज्यकारभारामुळे जगातील महासत्तादेखील भारताशी द्विपक्षीय संबंध प्रस्थापित करण्यात उत्सुक होताहेत. त्याची परिणती म्हणजे परकीय गुंतवणुकीत वेगाने वृद्धी होत आहे.अणू चाचण्या, शस्त्र निर्मिती, राष्ट्रीय महामार्गांची व्याप्ती वाढविणे, रेल्वे सोयी-सुविधांचे बळकटीकरण, स्वदेशी बनावटीची संरक्षण सामग्रीच्या निर्मितीला प्राधान्य, डिजिटल कनेक्टिव्हिटी, डिजिटल ट्रान्सफॉर्ममेशन या बाबींवर विशेष लक्ष केंद्रित केले जात आहे. अर्थातच विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, उद्योग, दळणवळण, स्वदेशी युद्धसामग्री निर्मिती, अंतराळ, कृषी विकास यावर विशेष भर देऊन सबका साथ,सबका विकास, सबका विश्वास या ब्रीदनुसार देशाला सर्वच क्षेत्रात आघाडीवर आणत, मोदीजींनी भारताला विकसित देशांच्या पंगतीत आणून बसविलं आहे, याचा आम्हा भारतीयांना सार्थ अभिमान आहे. न भूतो न भविष्यती असा सर्वांगिण विकास करून मोदीजींनी देशाचा कायापालट करून दाखविला. भारताला वैश्विक स्तरावर १० स्थानावरून ५ स्थानावर आणले, ही मोदी सरकारची सर्वात मोठी उपलब्धी आहे. त्यामुळेच त्यांना वैश्विक गुरू म्हणून मानाचं पान मिळालं, हे समस्त भारतीयांसाठी मोठ्या अभिमानाची गोष्ट आहे. क्रांतिकारकांच्या बलिदानानं मिळविलेल्या स्वराज्याचं रूपांतर सुराज्यात करण्यात मोदीजींच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारने दमदार आगेकूच केली आहे. यासाठी त्यांचे मनस्वी अभिनंदन अन् पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा! समस्त भारतीयांना स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा. भारतीय स्वातंत्र्य चिरायू होवो! वंदे मातरम्! भारत माता की जय! जय हिंद! जय महाराष्ट्र !

---

# भारतीय संविधानाचे जनक कोण?



**संजीव मोरे**

एक अस्पृश्य घरात जन्मलेला मुलगा ते भारतीय संविधानाचा निर्माता असलेले डॉ. आंबेडकर काही दलित विरोधी मानसिकता असणाऱ्या संकोचित मनोवृत्तीच्या लोकांच्या पचनी पडत नाहीत. दलित बहुजनांचे वर्चस्व मान्य करणे हे त्यांना अपमानजनक वाटते. याचाच एक भाग म्हणून अरूण शौरी नावाच्या एका धंदेवाईक पत्रकाराने १९९७ मध्ये वरशिपिंग फॉल्स गॉड्स हे पुस्तक लिहिले त्या पुस्तकात डॉ. आंबेडकर हे घटनेचे शिल्पकार नसून प्रेम विहारी नारायण रायजादा यांनी घटना लिहिली आहे हे सांगण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. वास्तविक रायजादा यांचे अक्षर अत्यंत सुंदर असल्याने अगोदरच तयार झालेल्या घटनेची दुसरी प्रत म्हणजे फोटो कॉपी करण्याचे काम त्यांनी केले होते. अर्थात या खोट्या प्रचाराच्या विरोधात अत्यंत उत्स्फूर्त प्रक्रिया उमटणे स्वाभाविक होते. डॉ. विठ्ठलराव गाडगीळ, गोविंद तळवलकर, वसंतराव मून, प्रकाश आंबेडकर आणि सुरेश माने यांच्यापर्यंत अनेकांनी शौरींच्या पुस्तकाचा समाचार घेतला. अर्थात या सर्वात डॉ.य.दि. फडके यांचा डॉ. आंबेडकरांचे मारेकरी- अरूण शौरी हा लेख एप्रिल १९९९ मध्ये प्रसिद्ध केला. त्याद्वारे शौरींच्या सर्वच मुद्द्यांना चोख उत्तर दिलेले आहे.

भारतासारख्या प्रगल्भ अशा लोकशाहीवादी देशात आतंकवादापेक्षा जातंकवाद फार मोठ्या प्रमाणावर फोफावत आहे. आतंकवादामुळे काही प्रमाणात मनुष्यहानी होते. परंतु जातीवादामुळे समाजाची प्रचंड मोठी हानी होते. समाजामध्ये असुरक्षतेची भावना निर्माण होऊन सामाजिक स्वास्थ बिघडते. असाच काहीसा प्रयत्न डॉ. आंबेडकर विरोधी दोन अर्धवट ज्ञानी स्वामी आनंद स्वरुप आणि ॲड. अनिल मिश्रा आपल्या वक्तव्यातून करताना दिसत आहेत. पुन्हा डॉ. आंबेडकरांना ते लक्ष करत असून डॉ. आंबेडकर हे संविधानाचे निर्माते नसून बी.एन.राव हे संविधान निर्माते आहेत. हे सिद्ध करण्याचा पुन्हा एकदा प्रयत्न करत आहेत. मात्र सूर्यप्रकाश त्यांच्या शब्दांच्या सावलीने अडला नाही. उलट अधिक उजळून निघाला. त्यांच्या तेजानेच राज्यघटनेतील प्रत्येक तरतूद प्रकाशमान झाली हे सांगायला राज्यघटना पुरेशी आहे. अशा या अर्धवट ज्ञानी, सत्यता काय आहे. याच्या मुळाशी न जाता केवळ डॉ. आंबेडकरांना विरोध म्हणून अशा प्रकारे वर्तन करून दलित बहुजनांचा अपमान करण्याचा प्रयत्न सर्रासपणे केला जातो. हे समाजस्वार्थ्यासाठी धोकादायक आहे. अशा या वृत्तीसाठी गीतकार गजलकार राहत इंदौरी यांचा एक शेर या ठिकाणी कोड करतो जो अशा वृत्तीचा समाचार घेतो पोलखोल करतो.

आंबेडकरवाद कोई जहर नही है
बल्की वह शुद्ध देशी घी है
जो कुत्ता को हजम नही होता
और गधो को
समज नही होता

बी.एन.राव हे निश्चितपणे एक सन्मानित व्यक्ती होते. मोठे विद्वान होते. कायद्याचा त्यांचा गाडा अभ्यास होता. कलकत्ता उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून त्यांनी काम केलेले होते. परंतु संविधान निर्मितीमध्ये त्यांचा सहभाग फक्त सल्लागार म्हणून मर्यादित होता. २९ ऑगस्ट १९४६ पर्यंत संविधान सभेमध्ये जे निर्णय घेतले गेले. त्याच्या कायद्याच्या भाषेत ड्राफ्ट तयार करून तो मसुदा समितीला सादर करणे. तसेच अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड या देशांच्या घटना तपासून त्यातील काही मुद्दे तयार करून त्यांचा कच्चा मसुदा सादर करण्याचे आदेश त्यांना देण्यात आले होते. त्याप्रमाणे त्यांनी २७ ऑक्टोबर १९४७ रोजी २४० कलमे आणि १२५ परिशिष्टे असलेला ड्राफ्ट समिती सादर केला होता. परंतु देशहिताच्या दृष्टीने त्यामधून काय घेणे आवश्यक आहे आणि काय नाही हे देशातील संस्कृती, जाती, धर्म, भाषा, प्रांत यासारख्या बाबींचा विचार करून त्यामध्ये फेरफार करून मसुदा समिती अंतिम निर्णय घेणार होती. शिवाय तो ड्राफ्ट स्विकारावाच असे बंधन मसुदा समितीवर नव्हते. म्हणून जे केवळ सल्ला देण्याचे काम करत होते, कोणत्याही चर्चेत त्यांचा सहभाग नव्हता ते कोणत्याही समितीचे सदस्य नव्हते.

कोणत्याही प्रांतातून त्यांची निवड झालेली नव्हती. म्हणून घटना निर्मितीच्या प्रक्रियेत त्यांचा दुरान्वयेही संबंध नव्हता. म्हणून भारतीय राज्य घटनेला आकार देत अंतिम स्वरूप देण्याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेच आहे तेच घटनेचे शिल्पकार आहेत हे जगमान्य आहे.

आमच्या राज्य घटनेचा जन्म ९ डिसेंबर १९४६ ते डिसेंबर १९४९ या तीन वर्षाच्या डॉ. बाबासाहेबांच्या दीर्घ कष्टानंतर झाला. या काळात घटना समितीची ११ अधिवेशन झाली. ११४ दिवसांपर्यंत घटनेवर चर्चा झाली. मसुदा समितीची निवड २९ ऑगस्ट १९४७ रोजी झाली. या समितीने १४१ दिवसांनी मसुदा तयार केला. प्रस्तावित घटनेच्या मसुद्यामध्ये ३४३ कलमे आणि १३ परिशिष्टे होती. या कलमांमध्ये ७६३५ दुरुस्त्या सुचविणेत आल्या. त्यापैकी २४७३ दुरुस्त्या मान्य करण्यात आल्या. हे सर्व काम डॉ. आंबेडकरांनी केले. संविधान सभेने मान्य केलेल्या राज्यघटनेत ३९५ कलमे आणि ८ परिशिष्टे समाविष्ट करण्यात आली.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेबांना मान दिला जातो तो यथार्थ आहे. त्याचे कारण मसुदा समितीमध्ये जरी सात सदस्य असले तरी त्यांच्या कामाविषयी माहिती देताना श्री.टी.टी. कृष्णम्माचारी यांनी घटना समितीत केलेल्या भाषणात बाबासाहेबांचा विशेष उल्लेख करून ते म्हणाले की या सभागृहाने मसुदा समितीमध्ये सात सभासदांची नियुक्ती केली होती.

त्यापैकी एका सभासदाने राजीनामा दिला, एका सदस्याचे निधन झाले, एक सदस्याची नेमणूक दुसऱ्या समितीमध्ये केली गेली, एक सदस्य अमेरिकेला निघून गेले. काही सदस्य हे स्थानिक राज्यकारभारात गुंतले, एक सदस्य प्रकृती अस्वास्थ्यामुळे बैठकांना हजर राहत नसत. त्यामुळे घटनेचा मसुदा तयार करण्याचे काम एकट्या डॉ. आंबेडकरांवर पडले. तरीही त्यांनी हे काम अत्यंत मनापासून प्रशंसनीयरित्या पूर्ण केले आणि आभाराचा कार्यक्रम १७ नोव्हेंबर १९४९ ते २५ नोव्हेंबर १९४९ पर्यंत म्हणजे एक आठवडा चालेल तसेच राज्यघटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद या संदर्भात म्हणतात की, डॉ. आंबेडकरांनी प्रकृती साथ देत नसतानाही अत्यंत कठीण असे परिश्रम घेतले आणि त्यांच्या परिश्रमाने त्यांनी केलेल्या कार्याला तेजोवलय प्राप्त झाले.

त्यामुळेच डॉ. आंबेडकर भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार आहेत. आणखी सर्वात महत्त्वाचा पुरावा म्हणजे कोलंबिया विद्यापीठाने ५ जून १९५२ रोजी डॉ. बाबासाहेबांना सन्मानपूर्वक डॉक्टर ऑफ लॉ ही पदवी बहाल केली. ती मुळातच ते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आहेत म्हणूनच.

माणूस म्हणू जगणेच नाकारलेल्या दलित-बहुजनांना सन्मान मिळवून देण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी संविधान निर्मितीचे नेतृत्व केले. तेव्हा आपण जातीय मानसिकतेची परिधान केलेली वस्त्र बाजूला सारून सत्य स्विकारले पाहिजे. त्यांच्या विचारांना कार्याला समजून घेत त्यांचे नेतृत्व मान्य केले पाहिजे. तेच या देशाच्या उन्नतीसाठी अपरिहार्य आहे आणि घटनांना निर्मितीचे जनक कोण आहेत हे या देशालाच नव्हे तर जगातील १९५ देशांना माहिती आहे. कारण जगाने ते स्विकारले आहे. म्हणून वेळोवेळी जनतेमध्ये संभ्रम करणे मनुवादी वृत्तीने बंद केले पाहिजे.

---

**दिनविशेष**

## भारतीय स्वातंत्र्याची ७८ वर्ष

आज आपण आपल्या देशाचा ७९ वा स्वातंत्र्य दिन साजरा करत आहोत. आजच्याच दिवशी ७८ वर्षापूर्वी म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश इंग्रजांच्या गुलामीतुन मुक्त झाला. त्यापूर्वी आपल्या देशावर इंग्रजांचे राज्य होते. व्यापारी म्हणून आलेले इंग्रज बघता बघता या देशाचे मालक बनले आणि कोट्यावधी भारतीयांना त्यांनी गुलाम बनवले. देश पारतंत्र्यात गेला. सुमारे दीडशे वर्ष इंग्रजांनी आपल्या देशावर राज्य केले. तेवढ्या काळात त्यांनी आपला इतिहास, आपला पराक्रम आपला स्वाभिमान नष्ट करण्याचेच काम केले. ज्या देशात सोन्याचा धूर निघत होता त्या देशाला कंगाल करण्याचेच काम त्यांनी केले.

देशातील नागरिकांना गुलामीची वागणूक दिली. गोरगरीब, सरळ साध्य मार्गाने जगणाऱ्या भारतातील नागरिकांवर त्यांनी अनन्वित अत्याचार केला. इंग्रजांच्या या अन्याय अत्याचाराने त्रस्त झालेल्या जनतेने इंग्रजांविरुद्ध पहिला उठाव केला तो १८५७ साली. दुर्दैवाने हा उठाव यशस्वी होऊ शकला नाही तरी इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी भारतीयांना प्रेरणा देणारा हा उठाव ठरला.

---

# श्रीकृष्ण येत आहे

खरंच आपण सुद्धा कधी-कधी हा विचार करत असाल की मोरमुकुटधारी, पिवळा पितांबरधारी, मनमोहन, गिरधर-गोपाळ, मुरलीधर श्रीकृष्णाने आपल्या पूर्व जन्मात असा कुठला महान पुरूषार्थ केला होता, ज्याचे फलस्वरूप या साकार सृष्टीवर त्याला सर्वश्रेष्ठ पद प्राप्त झाले.

दरवर्षी श्रावण वद्य अष्टमीला श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव सर्व भारतभर मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. श्रीकृष्णाचे भक्त त्याची भक्ती करताना भावविभोर होऊन तल्लीन होतात. भक्ती सागरात जणू लीन होतात. श्रीकृष्णाचा महिमा वर्णन करताना आनंदरसाने ओतप्रोत होतो. श्रीकृष्णाचा क्षणिक साक्षात्कार व्हावा यासाठी जन्मजन्मांतर त्यांचे डोळे व्याकुळ असतात. श्रीकृष्णाच्या मनमोहक मूर्तीला पाहून भक्तगण गदगद होऊन जातात. झोपाळ्यात टाकून झोके देताना ते स्वतःला भाग्यवान समजतात व मोठ्या आनंदाने गीत गातात-

**यशोदा के बाल, नंद के लाला**
**मुरली सुनाने, आओ मेरे ग्वाल।**

खरंच भक्तांच्या खुशीला पारावार राहत नाही. हे सगळे पाहून साहजिकच मनात एक उत्कंठा निर्माण होते की श्रीकृष्णाची मूर्ती जर इतकी मनमोहक आहे, सर्वांचे हृदय जिंकणारी आहे, अलौकिकता व दिव्यता संपन्न आहे, तर साक्षात श्रीकृष्ण किती मनमोहक असेल? तसेच जर का तो साकार सृष्टीवर प्रत्यक्ष आला तर काय होईल? परंतु शास्त्रात असे गायन आहे की देवता पतीत सृष्टीवर पाऊल देखील ठेवत नाहीत. वर्तमानसमयी आपण पाहतो की कलियुगी सृष्टी ही पतित, विकारी, तमोप्रधान बनली आहे. सर्वत्र अज्ञानाचा अंधकार पसरला आहे. विषय विकारांचे साम्राज्य पसरले आहे. मनुष्याच्या दृष्टी-वृत्ती व कृतीम्ये प्रेम व पवित्रतेची भावना पूर्णतः लोप पावली आहे. चोरी, लबाडी, भ्रष्टाचार, हिंसाचाराच्या अग्नि सर्वत्र पेटला आहे. आसूरी वृत्तीमुळे मनुष्य असुरसमान बनत चालला आहे. श्रीकृष्णाविषयी असे कुठलाही मनुष्य म्हणू शकणार नाही की त्याच्या मनात वचन वा कर्मात अपवित्रता होती व जीवनाचे कुठले बंधन होते. श्रीकृष्णाला १६,१०८ राण्या असूनही तो निर्विकारी होता.

आपले सर्वांचे हे स्वप्न साकार करण्यासाठी परमपिता शिव परमात्मा, प्रजापिता ब्रह्माबाबा यांच्या माध्यमांद्वारे संदेश देतात. प्रिय वत्सांनो, ईश्वरीय ज्ञान व सहज राजयोगाद्वारे स्वतःला तसेच प्रकृतीच्या पाच तत्वांना पावन बनवा. कुणालाही दुःख देऊ नका व कधी दुःखाचा स्विकार करू नका. खोटे बोलू नका. पापकर्म करू नका. श्रीकृष्ण या भारतभूमीवर पुन्हा साक्षात चैतन्य रूपात येत आहे. हा अति आनंददायी संदेश तुम्हाला आम्ही देत आहोत- तुम्हीही सर्वांना सांगा. 'श्रीकृष्ण लवकरच येत आहे...'

**- बी.के. भारतीदीदी**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१५ ऑगस्ट

१) श्री. श्रीरंग पांडुरंग घरत
थळ, अलिबाग, १५-८-१९४३

२) श्री. धनंजय नारायण कवळे
वरसोली, अलिबाग, १५-८-१९४७

३) श्रीम. प्रमोदिनी प्रतापराव सरनाईक
पिंपळभाट, अलिबाग, १५-८-१९४७

४) श्री. शरद किसन कोरडे
श्रीबाग, अलिबाग, १५-८-१९५१

५) श्री. विजयकुमार दत्तात्रेय पाटील
पिंपळभाट, अलिबाग, १५-८-१९५५

६) श्री. विजय पांडुरंग पाटील
नवगाव, अलिबाग, १५-८-१९४७

७) श्रीम. शितल शरदचंद्र पाटील
कुरूळ, अलिबाग, १५-८-१९५७

८) श्री. प्रभाकर कमलाकर पाटील
शहापूर, अलिबाग, १५-८-१९६१

# खड्डेभरणी मोहिमेवरून श्रेयवाद

## ● लोकप्रतिनिधींच्या केविलवाण्या प्रकारावर नागरिकांकडून टीका

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

उल्हासनगरात महापालिकेच्या खड्डेभरणी मोहिमेवरून सत्ताधारी भाजप आणि टीम ओमी कलानी यांच्यात 'कुणामुळे काम सुरू झालं?' हा श्रेयवाद रंगला आहे. समाज माध्यमांवर यावरून आरोप-प्रत्यारोपांचा पाऊस पडत असतानाच उल्हासनगर महापालिकेने याबाबतची माहिती सादर करताना जीपीएस तंत्राद्वारे काढलेले फोटो जाहीर केले आहेत. यातील अनेक फोटो नेत्यांच्या मागणीपूर्वीचे आहेत. त्यामुळे श्रेयवादाच्या केविलवाण्या प्रकारावर शहरातून टीका होत आहे.



उल्हासनगर शहरातील खड्ड्यांचा प्रश्न जून महिन्यापासून गंभीर बनला होता. शहरातील नागरिक, माध्यमे, रीलस्टार, समाज माध्यमांवर विविध प्रकारे खड्ड्यांबाबत माहिती देत होते. अपघात, कोंडी, रिक्षा चालकांचा व्यवसाय यावरून काही रॅप गाणी शहरात चर्चेत होती. त्यात उशिराने स्थानिक लोकप्रतिनिधींनी उडी घेतली. दरम्यान, टीम ओमी कलानीने 'शर्म करो, खड्डे भरो' मोहीम राबवून भाजप आमदार कुमार आयलानी यांच्यावर थेट निशाणा साधला.

त्यावर प्रत्युत्तरादाखल ११ ऑगस्ट रोजी आमदार आयलानी यांनी सात दिवसात खड्डे न भरल्यास आंदोलन असा इशारा सोशल मीडियावर व्हिडिओद्वारे दिला होता. मात्र उल्हासनगर महापालिकेने स्थानिक आमदारांच्या इशाऱ्यानंतर शहरात सुरू असलेल्या खड्डे भरण्याच्या प्रक्रियेची माहितीच सादर केली. महापालिका आयुक्त मनिषा आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अतिरिक्त आयुक्त डॉ. धीरज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली २ ऑगस्ट २०२५ पासून शहरातील रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी युद्धपातळीवर मोहीम सुरू झाली. त्यापूर्वी १४ जुलैपासूनच खड्डे बुजविण्याची प्रक्रिया सुरु असल्याचे आणि त्यासाठी लेखी आदेशही निघाल्याचे पालिका सूत्रांनी स्पष्ट केले आहे. पावसामुळे आणि कायदेशीर निविदा प्रक्रियेमुळे कामाला उशीर झाला, परंतु मास्टिंग डांबर तंत्रज्ञानाचा वापर करून प्रभागनिहाय खड्डे भरण्यास आंदोलने आणि इशाऱ्यापूर्वीच सुरूवात झाल्याचे पालिका सुत्रांनी सांगितले आहे. विशेष म्हणजे महापालिकेने १२ ऑगस्टला जीपीएस प्रणालीतून टिपलेले खड्डे भरण्याचे फोटो प्रसिद्ध करत हे काम आधीपासूनच सुरू असल्याचे दाखवून दिले. त्यामुळे खड्डे भरल्याचे श्रेय घेणाऱ्यांचे मनसुबे धुळीस मिळाल्याचे बोलले जाते आहे.

### निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून हातघाई

पालिकेने जाहीर केलेल्या माहितीनंतर शहरात समाज माध्यमांवर श्रेयवादासाठी पुढे येणाऱ्या लोकप्रतिनिधींवर टीका केली जाते आहे. खड्डे जूनपासून होते तर इशारा देण्यासाठी ऑगस्ट महिना का उजाडावा लागला, असा प्रश्न आता स्थानिक आमदारांना समाजमाध्यमांवर विचारला जात आहे. तर खड्डे बुजत आहेत हे आमच्यासाठी महत्वाचे आहे, अशी प्रतिक्रियाही समाज माध्यमांवर नागरिक देत आहेत. पालिका निवडणुकांच्या तोंडावर लोकप्रतिनिधींची सुरू असलेली हातघाई शहरात चर्चेचा विषय ठरत आहे.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**कै. सुधीर श्रीधर गावंड, स्मरणार्थ अलिबाग**

## सुवर्णकण



सद्गुरू शरणागती सर्वश्रेष्ठ अध्यात्मिक साधना आहे.

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण**

# वेशांतर करून बहिणीच्या सासरी चोरी

## ● महिला आरोपीला अटक; दीड कोटींचा ऐवज हस्तगत

**। वसई । प्रतिनिधी ।**

वसईत दीड कोटी रुपयांच्या चोरीचा एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शेअर बाजारात झालेल्या मोठ्या नुकसानाची भरपाई करण्यासाठी एका २७ वर्षीय अविवाहित तरुणीने आपल्या सख्ख्या बहिणीच्या सासरच्या घरी चोरी केली. ही घटना घडल्यानंतर अवघ्या १२ तासांत पोलिसांनी आरोपी तरुणीला अटक केली. यावेळी चोरीला गेलेले दीड कोटी रुपयांचे दागिनेही जप्त करण्यात आले आहेत. ज्योती भानुशाली (२७) असे अटक केलेल्या महिलेचे नाव आहे.

वसईतील उदय भानुशाली (६६) यांच्या घरी काही दिवसांपूर्वी चोरीची घटना घडली. आरोपी ज्योती भानुशाली ही उदय भानुशाली यांच्या मोठ्या सुनेची सख्खी बहीण आहे. ज्योतीने चोरी करण्यासाठी एक अनोखी युक्ती वापरली. तिने पुरुषाचा वेश धारण केला आणि घरात शिरली. घरात आल्यावर तिने उदय भानुशाली यांना बाथरूममध्ये कोंडून ठेवले. त्यानंतर तिने घरातील कपाटात ठेवलेले दीड कोटी रुपयांचे सोन्याचे दागिने घेऊन पळ काढला. या चोरीची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला.

पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, त्यांना एका पुरुषाच्या वेषात असलेल्या व्यक्तीवर संशय आला. या व्यक्तीच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी अधिक तपास केला. तेव्हा ही व्यक्ती पुरुष नसून एक तरुणी असल्याचे उघड झाले. पोलिसांनी आरोपी ज्योतीला गुजरातमध्ये जाऊन अवघ्या १२ तासांत अटक केली. पोलिसांच्या चौकशीत ज्योतीने कबूल केले की तिला शेअर मार्केटमध्ये मोठा तोटा झाला होता. हा तोटा भरून काढण्यासाठी तिने हे पाऊल उचलले.

# कचऱ्याच्या ढिगाऱ्यात सापडले जिवंत अर्भक

**। सोलापूर । प्रतिनिधी ।**

मोहोळ तालुक्यातील चिखली येथे बुधवारी (दि. १३) कचऱ्याच्या ढिगाऱ्यात जिवंत पुरुष जातीचे अर्भक आढळून आले. या घटनेमुळे चिखली व परिसरात खळबळ उडाली असून, उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे. गावातील सामाजिक कार्यकर्त्यांसह अन्य नागरिकांनी त्याला तातडीने मोहोळ येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. त्यामुळे त्या अर्भकाला जीवदान मिळाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, चिखली येथील एका किराणा दुकानाजवळील बोळातील कचऱ्याच्या ढिगाऱ्यात एक पुरुष जातीचे, सुमारे दोन दिवस वयाचे अर्भक होते. दरम्यान दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास त्या ठिकाणाजवळून एक महिला जात असताना तिला रडण्याचा आवाज आला. तिने कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळ जाऊन पाहिले तिला एक लहान अर्भक कचऱ्याच्या ढिगाऱ्यात रडताना दिसले. त्याच्या अंगाला पालापाचोळा, बिस्किटाची कागदे लागली होती. त्यावेळी तिने ही माहिती गावातील काही नागरिकांना सांगितली असता सामाजिक कार्यकर्ते मते, पोलीस पाटील व अन्य गावकरी त्या ठिकाणी जमा झाले. त्यांनी एका खाजगी वाहनातून उपचारासाठी त्या अर्भकाला मोहोळ येथील विहान रुग्णालयात दाखल केले.

डॉ. ज्योती मस्के यांनी त्या अर्भकाची स्वच्छता करून निरीक्षण केले असता त्या बाळाचे हातपाय काळे निळे पडले होते, खरचटल्यामुळे रक्तही येत होते. त्यावर त्यांनी उपचार केले. सध्या बाळाची शारीरिक अवस्था चांगली आहे.

मात्र, अज्ञात महिलेची डिलिव्हरी कशी व कुठे झाली याची माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले. या घटनेची फिर्याद गावकामगार पोलीस पाटील विठ्ठल मते यानी मोहोळ पोलिसात दिली असून, अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# स्पा सेंटरच्या नावाखाली अश्लील धंदे

## पोलिसांनी धाड टाकत घेतले पाच जणांना ताब्यात

**। छ. संभाजीनगर । प्रतिनिधी ।**

वजिराबाद पोलिसांनी बुधवारी (दि. १३) रात्री भाजी मार्केटच्या इमारतीत चालू असलेल्या द फ्युजन स्पा सेंटरवर धाड टाकली. यामध्ये तीन तरुणी, एक महिला व व्यवस्थापकासह पाच जणांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

दहा दिवसापूर्वी नांदेडच्या कॅनॉल रोडवर एका स्पा सेंटरवर धाड टाकून पोलिसांनी तिघा जणांना अटक केली होती व यातील अन्य तीन महिलांची महिला सुधारगृहात रवानगी केली होती. यातील दोन आरोपी अद्यापही पोलिसांना सापडले नाहीत. हे प्रकरण ताजे असताना बुधवारी रात्री वजिराबाद पोलिसांना स्पा सेंटरच्या नावाखाली कुंटणखाना सुरु असल्याची माहिती मिळाली होती. मिळालेल्या गुप्त माहितीनुसार पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकासह वजिराबाद भागातील जुन्या भाजी मार्केटच्या इमारतीत सुरु असलेल्या द फ्युजन स्पा सेंटरवर धाड टाकली. त्यावेळी वेगवेगळ्या विचित्र अवस्थेत असलेले ग्राहक त्याठिकाणी आढळून आले. तसेच काही पिडीत मुली व महिला देखील आढळून आल्या. या कारवाईत पोलिसांनी तेथे असलेल्या काही वस्तू जप्त केल्या आहेत. स्पा सेंटरमधील तरुणी दिल्ली, आसाम व अन्य ठिकाणावरुन आल्याची चर्चा सर्वत्र होताना दिसून येत आहे.

नांदेड पोलिसांनी स्पा सेंटरच्या नावाखाली सुरु असलेल्या कुंटणखान्याचा पर्दाफाश करुन सलग दुसरी कारवाई केल्याने अवैध चालकांचे धाबे दणाणले आहेत. या प्रकरणात तीन पिडीत तरुणी, एक महिला व व्यवस्थापक अशा पाच जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. दरम्यान, बाहेर राज्यातून आणल्या जाणाऱ्या तरुणीचे रॅकेट कोण चालवितो व त्यांचा प्रमुख सूत्रधार कोण आहे, याची माहिती पोलीस घेत आहेत.

# पोलीस शिपायाची आत्महत्या

**मिरारोड :** भाईंदर पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस शिपायाने गुरुवारी (दि. १४) सकाळी आत्महत्या केली. रितिक चौहान (२४) असे या पोलीस शिपायाचे नाव असून तो मूळचा नाशिक जिल्ह्यातील सिन्नर गावातील रहिवासी होता. मिरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयात २०२३ च्या पोलीस भरतीद्वारे रितिक चौहान सामील झाला होता. पोलिसांना माहिती मिळताच घटनास्थळी जाऊन मृतदेह ताब्यात घेतला. आत्महत्येचे कारण स्पष्ट झाले नसून तपास सुरु असल्याची माहिती वरिष्ठ पोलिसांनी दिली.

# गोवा बनावटीची दारू जप्त

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

राजापूर तालुक्यात गोवा बनावटीच्या दारूची चोरटी वाहतूक करणाऱ्या एका तरुणावर राजापूर पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. तालुक्यातील खडपेवाडी येथे ही कारवाई करण्यात आली असून, पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून दारू आणि दुचाकी असा एकूण ५१,०८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी (दि. १३) दुपारी १२:५५ च्या सुमारास, खडपेवाडी येथील हनुमान मंदिराजवळून गुजराळीकडे जाणाऱ्या रस्त्यावर राजापूर पोलिसांचे पथक गस्त घालत होते. यावेळी त्यांना राजप्रतीक प्रमोद पाटकर (वय ३०, रा. खडपेवाडी) हा तरुण संशयास्पदरित्या थांबलेला आढळला. पोलिसांनी त्याची चौकशी केली असता, तो आपल्या ताब्यातील सुझुकी ॲक्सेस १२५ या दुचाकीच्या डिक्कीमध्ये गोवा बनावटीची दारू लपवून तिची वाहतूक करत असल्याचे उघड झाले. पोलिसांनी तात्काळ गाडीची झडती घेतली. यावेळी डिक्कीमध्ये हनी ब्लेंड प्युअर ब्रँडी या गोवा बनावटीच्या १८० मिलीच्या ३६ सीलबंद बाटल्या सापडल्या. ज्यांची किंमत १०८० रुपये आहे. पोलिसांनी दारूसाठा आणि वाहतुकीसाठी वापरलेली दुचाकी जप्त केली आहे.

# केळवे परिसरात बिबट्याचा वावर

**पालघर :** केळवे गावातील वर्तक पाखाडी व करंदाळी दरम्यान राहणारे हार्दिक सावे यांच्या घरी बसवलेल्या सीसीटीव्हीमध्ये बुधवारी (दि. १३) रात्री १० वाजताच्या सुमारास बिबट्याचा वावर दिसला. ही माहिती त्यांनी पोलिसांना दिल्यानंतर पोलिसांनी वनविभागाला सूचित केले. त्यानंतर पोलीस, वनविभाग, प्राणी मित्र यांनी संपूर्ण परिसर पिंजून काढला. बिबट्याच्या वावराचे ठसे काही ठिकाणी दिसून आले असले तरी रात्रीच्या अंधारात व पडणाऱ्या पावसात बिबट्या परिसरातून आढळून आला नाही. मात्र हे वृत्त गावामध्ये पसरले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

# गॅस सिलिंडर गळतीने घराला आग

**। पुणे । प्रतिनिधी ।**

आंबेगाव तालुक्यातील जवळे येथील गावठाणातील भरत कुशाबा गावडे यांच्या राहत्या घरी बुधवारी (दि. १३) रात्री ८ वाजण्याच्या सुमारास स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरची गळती होऊन लागलेल्या आगीत संसारोपयोगी वस्तू जळून खाक झाल्या.



जवळे गावठाण येथे भरत कुशाबा गावडे हे आपल्या पत्नी अनिता आणि मुलगा अनिल यांच्या समवेत राहतात. बुधवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास गॅस गळतीमुळे घराला आग लागल्याचे लक्षात येताच घरातील हे तिघेही जण घराच्या बाहेर पळाले. यावेळी गावातील सर्व तरुणवर्गाने आग आटोक्यात आणण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. वीज प्रवाह बंद करून पाण्याच्या साह्याने आग आटोक्यात आणली. यावेळी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सरपंच वृषाली शिंदे यांनी घटनेची माहिती तहसीलदार संजय नागटिळक यांना फोनवरून दिली असता तलाठी विश्वनाथ मुगदाळे यांनी घटनेचा पंचनामा केला. तसेच, अष्टविनायक गॅस एजन्सी नारायणगाव याठिकाणाहून गॅस सिलिंडरची गळती कशामुळे झाली, हे पाहण्यासाठी अधिकारीही आले होते. या आगीत घरातील टीव्ही, फॅन, मिक्सर, मोबाईल, सर्व भांडी, डबे, देवांच्या मूर्ती, धान्य, कपडे, घराच्या सर्व भागातील सर्व वस्तू जळून खाक झाल्या आहेत.

# महिलेचा मृत्यू

**नागपूर :** कामठी रिंग रोडवरील रनाळा शिवारात एका अज्ञात वाहनाच्या जोरदार धडकेत महिला कामगाराचा जागीच मृत्यू झाला. ही घटना बुधवारी (दि. १३) सकाळी अकराच्या सुमारास घडली. उमा घनश्याम शर्मा (४५, रा. डहाके लेआऊट, गोधणी रोड, नागपूर) असे मृत महिलेचे नाव आहे असून त्या ऑरेंज सिटी बिल्डरकडे कामासाठी मिस्त्रीसोबत गोधणीहून भिलगाव येथे जात होत्या. रनाळा शिवारात रिंग रोड ओलांडताना लिहीगावावरून कळमेश्वरकडे जाणाऱ्या पिवळ्या व शेंदरी रंगाच्या टेम्पो सदृश अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेत महिलेचा जागीच मृत्यू झाला.

# चरामध्ये चाक अडकून बसचा अपघात

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

कोकणनगर-मजगाव रस्त्यावर गुरुवारी (दि. १४) सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास शहर वाहतूक करणारी बस खोदलेल्या चरामध्ये अडकून अपघात झाला. यामध्ये शाळेतील मुले आणि काही प्रवासी जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.



माजगावकडे जाणाऱ्या रस्त्यावर प्रशांतनगर-विमानतळ रोड या ठिकाणी कोस्टगार्डसाठी इलेक्ट्रिक वायर अंडर ग्राउंड करण्यासाठी खोदाई करण्यात आली आहे. या रस्त्याला साईडपट्टीच शिल्लक ठेवलेली नसल्याने वाहनचालकांना अंदाज येत नसल्याने इथे वारंवार अपघात होत असल्याचे परिसरातील रहिवाशांनी सांगितले.

बुधवारी संध्याकाळच्या सुमारासही याच परिसरात खोदलेल्या चरामुळे रस्त्याचा अंदाज न आल्याने बसचे चाक चरीत गेले होते. त्यामुळे काही काळासाठी वाहतुकीसाठी अडथळा निर्माण झाला होता.

दरम्यान, या ठिकाणी योग्य माहिती मिळेल, असे फलक लावावेत जेणेकरून वाहन चालकांना वाहन चालवताना रस्त्याचा अंदाज येईल, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. अन्यथा रात्रीच्या वेळी प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना रस्त्याच्या विशिष्ट परिस्थितीचा अंदाज न आल्यास एखादी मोठी दुर्घटना घडू शकते.

# चिवेली व्यायामशाळा बांधकामाची फेरचौकशी

## क्रीडा संचालकांनी दिले आदेश

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

चिपळूण तालुक्यातील चिवेली येथील व्यायामशाळा बांधकामप्रकरणी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या संचालकांनी कोल्हापूर विभागीय उपसंचालकांना फेरचौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. याप्रकरणी चौकशी करून संबंधित दोषी अधिकारी व संबंधित तत्कालीन संस्था सदस्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

चिवेली येथे २०१४-१५ मध्ये आदर्श विद्यामंदिर चिवेली यांना व्यायामशाळा विकास अनुदान योजनेअंतर्गत व्यायामशाळा इमारत बांधकामास सात लाखांचे अनुदान मंजूर झाले होते. ते अनुदान संस्थेला वितरितदेखील करण्यात आले होते; मात्र, प्रस्तावानुसार त्या ठिकाणी प्रत्यक्ष व्यायामशाळेचे बांधकाम झाले नाही. याशिवाय त्याबाबत कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नसल्याने चौकशीत निदर्शनास आले होते. त्यामुळे या अनुदानाचा अपहार केल्याचा ठपका तत्कालीन जिल्हा क्रीडाधिकाऱ्यांनी ठेवला होता. त्यानंतर जिल्हा क्रीडाधिकारी यांच्याकडून योग्य ती फौजदारी कारवाई न होता व्याजासह रक्कम वसूल केल्याचे आढळून आले. यामध्ये संबंधितांनी व्याजासह १२ लाखांची रक्कम जिल्हा क्रीडाधिकाऱ्यांकडे जमा केली; मात्र याबाबत कोणावरही फौजदारी कारवाई झाली नसल्याची तक्रार माहिती अधिकार कार्यकर्ते विद्याधर साळुंखे यांनी क्रीडा व युवक संचालनालयाच्या आयुक्तांकडे केली होती.

## आसनगाव, एलटीटी रेल्वे पोलीस ठाण्याचे उद्घाटन | वाढत्या गुन्हेगारीला बसणार आळा

# रेल्वे स्थानकांतील सुरक्षेला बळकटी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**वाढत्या नागरिकरणामुळे मुंबई महानगरातील रेल्वे प्रवाशांची संख्या वाढत आहे. परिणामी, गर्दीचा फायदा घेऊन गुन्हेगारी प्रवृत्ती वाढली आहे. सध्या कार्यरत असलेल्या कुर्ला, वडाळा, कल्याण, वाशी रेल्वे ठाण्यांवरील कामाचा भार हलका करण्यासाठी आसनगाव, लोकमान्य टिळक टर्मिनस (एलटीटी) रेल्वे पोलीस ठाण्याचे १५ ऑगस्ट रोजी उद्घाटन करण्यात येणार आहे. त्यामुळे रेल्वे स्थानकांतील सुरक्षेला बळकटी येणार असून गुन्हेगारीला आळा बसणार आहे.**



गेल्या काही वर्षांमध्ये कल्याण-कसारा दरम्यानच्या प्रवाशांची संख्या प्रचंड वाढली आहे. मुख्यत: शहाड, टिटवाळा, वासिंद, आसनगाव या भागात नागरी वस्ती वाढल्याने रेल्वेवर अवलंबून असलेल्या प्रवाशांच्या संख्येत भर पडली आहे. तसेच देशभरातून लांबपल्ल्याच्या रेल्वेगाड्यांमधून एलटीटीमध्ये दाखल होणाऱ्या प्रवाशांची संख्याही वाढू लागली होती. त्यामुळे प्रवाशांमध्ये वाद, मारामारी, मोबाइल आणि मौल्यवान वस्तूंची चोऱ्या वाढली आहे. तसेच फटका टोळी व इतर चोरांच्या टोळ्या सक्रिय झाल्या आहेत. परंतु, कल्याण रेल्वे पोलीस ठाण्यावर कल्याण-बदलापूर आणि कल्याण-कसारा या रेल्वे स्थानकांचा भार असल्याने, गुन्हेगारांना रोखण्यात, आरोपींचा शोध घेण्यात विलंब लागत होत आहे. त्याचप्रमाणे कुर्ला, वडाळा, वाशी या रेल्वे पोलीस ठाण्यांवरही कामाचा भार वाढल्याने चोरीच्या प्रकरणांचा छडा लावण्यासाठी विलंब होत आहे.

कल्याण रेल्वे पोलीस ठाण्यातील टिटवाळा, खडवली, वासिंद, आसनगाव, आटगाव, तानशेत, खर्डी, उंबरमाळी, कसारा ही ९ रेल्वे स्थानके आसनगाव रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत येतील. तर, कुर्ला रेल्वे पोलीस ठाण्यातील एलटीटी; वडाळा रेल्वे पोलीस ठाण्यातील कुर्ला हार्बर फलाट क्रमांक ७-८, टिळक नगर, चेंबूर आणि वाशी रेल्वे पोलीस ठाण्यातील गोवंडी, मानखुर्द ही रेल्वे स्थानके लोकमान्य टिळक टर्मिनस (एलटीटी) रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत समाविष्ट करण्यात आली आहेत.

आसनगाव आणि एलटीटी या रेल्वे पोलीस ठाण्याचे उद्घाटन १५ ऑगस्ट रोजी करण्यात येणार आहे, अशी माहिती लोहमार्ग पोलीस आयुक्त एम. राकेश कलासागर यांनी दिली.

### आणखी दोन ठाणी वाढणार

मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावरून दररोज सुमारे ७५ लाख प्रवासी प्रवास करतात. प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. मध्य आणि पश्चिम रेल्वेवर १९९९ पासून एकूण १७ रेल्वे पोलीस ठाणी आहेत. आता आसनगाव आणि एलटीटी या दोन रेल्वे पोलीस ठाण्यांसह अंबरनाथ आणि भाईंदर येथे नवीन रेल्वे पोलीस ठाणी उभारण्यात येणार आहेत.

## निवडक



### पाली नगरपंचायतीतर्फे तिरंगा रॅली उत्साहात

**सुधागड/पाली :** स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवनिमित्ताने पाली नगरपंचायतीच्या वतीने हर घर तिरंगा रॅलीचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये ग. बा. बडेर हायस्कूल आणि टॉपवर्थ इंग्लिश मिडीयम स्कूलमधील एकूण १००० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. रॅलीची सुरुवात पालीतील श्री बल्लाळेश्वर गणपती देवस्थान येथून झाली. रॅली मार्गावर देशभक्तीपर घोषवाक्ये आणि तिरंग्याच्या लहरीने परिसर देशभक्तीने भारलेला होता. रॅलीचा समारोप छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे पुष्पहार अर्पण करून करण्यात आला. या कार्यक्रमास पाली नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी माधुरी मडके, आरिफ मनियार, सुलतान बेनसेकर, पराग मेहता, सुधीर भालेराव, सुधाकर मोरे हे उपस्थित होते. प्रशासनाच्या वतीने सुधागड-पालीचे तहसीलदार उत्तम कुंभार, नायब तहसीलदार ज्ञानेश्वर अडसुळ, नायब तहसीलदार नकुल पोळेकर तसेच पाली पोलीस ठाण्याच्या निरीक्षक हेमलता शेरेकर यांनी उपस्थित राहून रॅलीस मार्गदर्शन केले. या रॅलीस नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून देशभक्तीचा उत्सव साजरा केला. रॅलीच्या यशस्वी आयोजनाबद्दल पाली नगरपंचायतीच्या वतीने सर्व सहभागी शाळा, विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी आणि नागरिकांचे आभार मानण्यात आले.

### चिलठण हायस्कूलमध्ये तिरंगा अभियान

**खोपोली :** देशभरात देशभक्तीचे वातावरण निर्माण व्हावे, राज्यस्तरापासून गावपातळीपर्यंत तिरंगामय वातावरण व्हावे, या उद्देशाने राज्यात हर घर तिरंगा अभियान राबविण्यात येत असताना सर्व शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालय व अन्य ठिकाणी विविध कार्यक्रम राबवत हर घर तिरंगा अभियान मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. खालापूर तालुक्यातील ग्रामीण चिलठण येथील श्री स्वामी समर्थ एज्युकेशन सोसायटी खोपोलीच्या हायस्कूलमध्ये या अभियानांतर्गत १३ ऑगस्ट रोजी हायस्कूलचे संचालक जे. पी. पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करत विविध कार्यक्रम पार पडले. यावेळी श्री स्वामी समर्थ एज्युकेशन सोसायटी खोपोलीचे संस्थापक अध्यक्ष बळीराम पाटील यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. तर याप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थिनीनी राष्ट्रगीत, राज्यगीत व ध्वजगीत सादर करीत उपस्थितांची मने जिंकली.



### कर्जत शहरात पथनाट्य सादर

**नेरळ :** कर्जत शहरात कर्जत एज्युकेशन सोसायटी यांच्या माध्यमातून हर घर तिरंगा रॅली काढण्यात आली.विद्यार्थ्यांनी कर्जत शहरात रॅली काढून पथनाट्य सादर केली.

शासनाच्या हर घर तिरंगा अभियान राबविण्यात येत आहे. स्वतंत्र दिनापर्यंत ही अभियान सुरू राहणार असून कर्जत एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून रॅली काढण्यात आली. आमराई येथील शाळेच्या आवारातून निघालेली रॅली इंग्लिश मिडीयम स्कूलचे विद्यार्थ्यांनी बाजारपेठ तसेच स्टेशनपर्यंत रॅली काढली. तिरंगा रॅली मध्ये कर्जत एज्युकेशन सोसायटीचे सचिव प्रवीण गांगल, तसेच खजिनदार मदन परमार, सतिश पिंपरे आणि मुख्याधापिका अनुपमा चौधरी तसेच सर्व शिक्षक आणि मोठ्या प्रमाणात विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




### माथेरान नगरपरिषदतर्फे तिरंगा रॅली

**नेरळ :** माथेरान नगरपरिषदेतर्फे तिरंगा रॅली काढण्यात आली. हर घर तिरंगा रॅलीचे निमित्ताने माथेरान शहरात चित्रकला, रांगोळी स्पर्धा पालिकेच्या वतीने आयोजित केल्या होत्या. या स्पर्धे त माथेरान शहरातील सर्व शाळांचे विद्यार्थी तसेच नगरपरिषद शाळेचे विद्यार्थी सहभागी झाले होते. भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर २ ते १५ ऑगस्ट दरम्यान हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता हे अभियान देशभर राबवले जात आहे. या अभियानाचा एक भाग म्हणून नगरपरिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली हर घर तिरंगा रॅली काढण्यात आली. यावेळी माथेरान गिरीस्थान नगरपरिषद आयोजित वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक विद्यामंदिर अणि प्रा. शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने तिरंगा रॅली आयोजित करण्यात आली. यात्रेत विद्यार्थांनी तिरंगा ध्वज हातात घेऊन शहरात काढलेल्या रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्याच्या घोषणा देत देशभक्तीचा संदेश दिला. तसेच कचरा वर्गीकरण

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी मुलगा पाहिजे. संपर्क : ९९२३२३५०५६/८१४९६७३०१८
- दुकान गाळा भाड्याने देणे आहे. अलिबाग एस टी स्टॅन्ड जवळ ९७६४५४८६७९.
- अलिबाग मधील रेस्टॉरंटसाठी वेटर, कुक, इ. पाहिजे आहेत. तसेच किचन मॅनेजरची आवश्यकता आहे. इच्छुकांनी खालील फोन क्रमांकावर संपर्क साधावा. मोबाईल क्रमांक -७७६७८५३९९९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१



# हर घर तिरंगा अभियान उत्साहात

## जिल्ह्यामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायती, शाळा, महाविद्यालयांमध्ये १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत हर घर तिरंगा, तसेच हर घर स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत विविध कार्यक्रम, उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानाला रायगड जिल्ह्यात उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. जिल्ह्यात बुधवारी (दि.१३) स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी सार्वजनिक ठिकाणांसह रस्ते, पाण्याच्या टाक्या, पाणी स्त्रोत परिसर स्वच्छता, सार्वजनिक शौचालयांचा परिसर स्वच्छता करण्यात आले. यावेली गावात स्वच्छतेचा संदेश देण्यासाठी रॅलीदेखील काढण्यात आली. वेगवेगळ्या घोषणा देत स्वच्छता राखण्याचे आवाहन करण्यात आले. गुरुवारी(दि.१४) जिल्ह्यातील गावांतील सार्वजनिक ठिकाणे, रस्ते, चौक, बाजारपेठ, प्रमुख ठिकाणे यांची अंतिम स्वच्छता व सजावट आणि ध्वजारोहणासाठी ठिकाण निश्चित करण्यात आली.

## विविध ग्रामपंचायतीत ध्वजारोहण

**| रसायनी | प्रतिनिधी |**

राज्यात हर घर तिरंगा अभियान साजरा करणेबाबत, हर घर तिरंगा अभियान अंतर्गत विविध कार्यक्रम उपक्रमांचे अयोजन करण्याबात केंद्र शासनाकडून सूचना प्राप्त झाल्या आहेत, तीन टप्प्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, त्यानुसार गुरुवार (दि.१४) रोजी खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायतींनी तिसऱ्या टप्प्यातील कार्यक्रमांर्गत ग्राम पंचायत कार्यालयासमोर ध्वज वंदन करण्यात आले.

तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यात शहरी व ग्रामीण भागातील प्रत्येक घरावर तसेच शासकीय, निमशासकीय सहकारी खासगी आस्थापना कार्यालय ठिकाणी राष्ट्रध्वज १३, १४ व १५ ऑगस्ट रोजी फडकविण्यात येणार असून गुरुवार (दि.१४) ऑगस्ट रोजी ग्राम पंचायत कार्यालयावर ध्वज वंदन करण्यात आले.

ग्रुप ग्राम पंचायत वासांबे मोहोपाडा येथे उमा मुंढे, वावंढळ येथे सुहास कदम, आसरे येथे बळीराम जांभळे, चौक येथे रितू ठोंबरे, लोधीवली येथे पूजा तवले, वावर्ले येथे प्रिया विचारे, टेंभरी येथे रमेश गायकवाड, कलोते येथे निलेश म्हसकर, तुपगांव येथे रवींद्र कुंभार, वैभव पाटील, गोकुळदास राठोड, प्रवीण पेमारे, गणेश मोरे, महेश म्हसे, मंगला केदारे, सुहास वारे, प्रशांत कदम यांनी विविध ग्राम पंचायतीत ध्वजारोहण केले.



## श्रीवर्धनमध्ये तिरंगा दौड



**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन नगर परिषदतर्फे गुरुवार (दि.१३) ऑगस्ट रोजी श्रीसोमजाई मंदिर ते श्रीवर्धन समुद्र किनारापर्यंत आयोजित करण्यात आली होती. सदर तिरंगा दौडमध्ये शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उस्फुर्तपणे सहभागी झाले होते. स्वातंत्रचा अमृत महोत्सव अंतर्गत केंद्र शासनकडून सन २०२२ पासून हर घर तिरंगा मोहीम सुरु करण्यात आली आहे. लोकांच्या हृदयात देशभक्तीची भावना जागृत करणे तसेच भारतीय राष्ट्रध्वजासबद्दल जागरुकता वाढविणे ही कल्पना राबविण्या मागील मूळ कल्पना आहे. सदर तिरंगा दौडसाठी श्रीवर्धन नगरपरिषद मुख्याधिकारी विराज लबडे यांनी शाळा, महाविद्यालय प्रशासन, शिक्षक आणि विद्यार्थी वर्गाचे आभार मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वीरेंद्र वाणी यांनी केले.



## तिरंगा झेंडा खरेदीसाठी गर्दी

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

भारतीय स्वातंत्र्याचा ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा होणार आहे. या दिवशी देशात शासकीय, निमशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालयात मोठ्या उत्साहाने मान्यवरांच्या हस्ते तिरंगा डौलाने फडकवला जातो. १५ ऑगस्टच्या दिवशी आवडीने विद्यार्थी शाळेत घेऊन जाण्यासाठी तर कोणी आपल्या गाडीवर तिरंगा झेंडा मानाने डोलवा याकरीता विद्यार्थी पालकवर्ग व भारतीय नागरिक तिरंगा झेंडा खरेदीसाठी मुरुड बाजारपेठेतील हातगाडीवर लगबगीने खरेदी करताना दिसत आहेत.

## रेवदंड्यातून लाल किल्ल्यापर्यंतचा प्रवास

### २० वर्षीय दर्श नागोटकरची स्वातंत्र्य दिन सोहळ्यासाठी निवड

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

भारत स्थानिक तरुणाईसाठी तसेच त्यांच्या सामाजिक संस्थेसाठी अभिमानास्पद ठरलेली घटना म्हणजे ओएसिस बहुउद्देशीय समाजाभिमुख संस्था, रेवदंडा यांचा स्वयंसेवक समन्वयक दर्श नागोटकर यांची देशाची राजधानी नवी दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्वातंत्र्य दिन सोहळ्यात सन्मानीय युवा सामाजिक अतिथी म्हणून निवड होणे. सध्या गीता तटकरे पॉलिटेक्निक कॉलेज, कोलाड (रोहा) येथे शिक्षण घेणारे दर्श नागोटकर हे शिवमर्दानी आणि मलखांब या पारंपरिक भारतीय क्रीडा प्रकारांचे चाहते असून, कमी वयातच ते या क्रीडा




प्रकारांचे प्रशिक्षक म्हणूनही कार्यरत आहेत. त्यांच्या प्रशिक्षणाखाली अनेक युवकांना भारतीय पारंपरिक खेळांची ओळख झाली आहे. सामाजिक व क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत जिल्हा युवा अधिकारी अमित पुंड यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड करण्यात आली. नागोटकर हे भारत सरकारच्या क्रीडा व युवा कार्यक्रम मंत्रालय संचालित 'मेरा युवा भारत' (अलिबाग-रायगड) अंतर्गत सक्रिय स्वयंसेवक आहेत. या सोहळ्यासाठी देशभरातील निवडक युवा प्रतिनिधींची निवड झाली असून, त्यापैकी दर्श नागोटकर हे सर्वात कमी वयाचे प्रतिनिधी ठरणार आहेत. ओएसिस संस्थेतील एका स्वयंसेवकाची अशी राष्ट्रीय पातळीवरील निवड होणे ही संस्थेसाठी गौरवाची आणि अभिमानाची बाब असल्याचे पदाधिकाऱ्यांनी नमूद केले.

## नेरळमध्ये शेकडो विद्यार्थ्यांचा सहभाग

**| नेरळ | प्रतिनिधी |**

स्वतंत्र दिनाच्या निमित्ताने नेरळ ग्रामस्थांनी तिरंगा रॅलीचे आयोजन केले होते. या रॅलीमध्ये नेरळ गावातील सर्व शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. तर मोठ्या प्रमाणावर नागरिक सहभाग हातात तिरंगा ध्वज घेऊन सहभागी झाले होते.




तिरंगा रॅलीचे आयोजन स्वातंत्रदिनाच्या पार्श्वभूमीवर केले होते. तिरंगा रॅली कल्याण कर्जत राज्यमार्ग रस्त्यावरील हुतात्मा चौक येथून झाली. सुरुवातीला हुतात्मा चौकातील हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्या मूर्तींना पुष्पहार घालण्यात आले. त्यावेळी नेरळ गाव आणि परिसरातील असंख्य नागरिक उपस्थित होते. हुतात्मा चौकातून निघालेली रॅली माथेरान नेरळ रस्त्याने हेटकर आळी येथून गणेश मंदिरमार्गे लोकमान्य टिळक चौकातून हुतात्मा हिराजी पाटील चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे स्थगित करण्यात आली. या रॅलीमध्ये नेरळमधील सर्व शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यात एलएईएस शाळा, नेरळ विद्या मंदिर, विद्या विकास मंदिर, हाजी लियाकत स्कूल, शार्विल सीबीएससी स्कूल, रेम्बो स्कूल, नेरळ विद्या मंदिर कनिष्ठ महाविद्यालय आदी शाळांमध्ये विद्यार्थी सहभागी झाले होते.त्यावेळी विद्यार्थ्यांच्या हातात तिरंगा झेंडा होते.

## महावितरणचे अधिकारी ग्रामसभेस राहणार उपस्थित

**| कल्याण | प्रतिनिधी |**

ग्रामीण भागातील वीज ग्राहकांच्या जीवनात अमुलाग्र बदल करणाऱ्या प्रधानमंत्री सुर्यघर मोफत वीज योजना आणि प्रधानमंत्री कुसुम योजनेची माहिती वीज ग्राहकांना देण्यासाठी महावितरणचे अधिकारी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने दिनांक १५ ऑगस्ट रोजी ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतीत होणाऱ्या ग्रामसभेत उपस्थित राहणार आहेत.

नुकताच राज्यात महावितरणने सौर ऊर्जा क्षेत्रात १००० मेगा वॅट वीज निर्मितीचा टप्पा गाठला आहे. सौर ऊर्जे चा जास्तीत जास्त वीज ग्राहकांनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच या योजनेत सहभागी झाल्यावर मिळणाऱ्या फायद्याची माहिती ग्रामीण भागातील वीज ग्राहकांना देण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोबतच यावेळी योजनेत सहभागी होण्यासाठी ग्राहकांचे अर्ज आवश्यक कागदपत्रे घेऊन स्विकारले जाणार आहेत.

महावितरण कल्याण परिमंडळाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा, भांडूप परिमंडळाचे मुख्य अभियंता संजय पाटील यांच्या सह अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपविभागीय अधिकारी, शाखा अभियंता आपल्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेस हजर राहणार आहेत.



● पीएनपी होली चाईल्ड शाळेत गुरुवारी दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी थरावर थर रचून दहीहंडी फोडली. (छायाचित्र : समीर मालोदे)

## तळ्यात आकर्षक रंगाने सजल्या हंड्या

**| तळा | प्रतिनिधी |**

गोपाळकाल्यासाठी तळा बाजारपेठ सज्ज झाली असून बाजारपेठेत आकर्षक रंगाने सजविलेल्या दहीहंड्या विक्रीसाठी उपलब्ध झाल्या आहेत. दहीहंडी उत्सवासाठी नक्षीकाम असलेल्या हंडीस बाजारपेठेत अधिक मागणी दिसून येत आहे. हिरेजडित आणि आकर्षक रंगांनी सजविलेल्या दहीहंडीच्या किमतीत ३० रुपयांनी वाढ झाली आहे.



ग्रामीण भागातून माती आणून हंडी तयार केली जाते, त्यानंतर ती भट्टीत भाजली जाते. हंड्यांवर रंगरंगोटी, सुंदर नक्षीकाम तसेच हिरे, आर्टिफिशियल कपडा, लेस, टिकली, आरसा, गोंडे यासारख्या साहित्याचा वापर करून आकर्षक सजावट केली जाते.या सजावटीतील दहीहंडी सध्या लक्ष वेधून घेत आहेत. साध्या लाल रंगाच्या हंडीपासून ते विविध सजावटीनुसार हंड्यांच्या किमती १०० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंत आहेत. लहान मुलांना दहीहंडी फोडण्यासाठी साध्या लाल रंगाची हंडी विकत घेतली जाते, तर मोठ्या मंडळांमध्ये सजवलेल्या मोठ्या हंड्यांची खरेदी केली जात आहे. यामुळे माठ घडविणाऱ्या कारागिरांना मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळत असून या व्यवसायासाठी कुटुंबातील सर्व सदस्य मदत करतात. यातून हाताला काम मिळत आहे.





## गोविंदा आला रे आला...

● पनवेलच्या इंदूबाई इंग्लिश मीडियम शाळेत मुलांनी हंड्या फोडून गोविंदा जल्लोष केला, तर मुलीही खांद्याला खांदा लावून मागे राहिल्या नाहीत. यावेळी शिक्षक व कर्मचारी वर्गानेही आनंद साजरा केला. (छायाचित्र : राजेश डांगळे)

# शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे उपोषण सुरू

| उरण | प्रतिनिधी |

उरणमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी सोमवार दि.११ ऑगस्टपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. हे उपोषण शेवा येथील जे.एन.पी. विद्यालयाच्या गेटसमोर सुरू करण्यात आले आहे. उपोषणाच्या पहिल्याच दिवशी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आणि स्थानिक नागरिकांनी पाठिंबा दर्शवत कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना पाठिंबा दिला. त्यांनी आपल्या मनोगतातून कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना जाहीर पाठिंबा दर्शवला. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत उपोषणाला पाठिंबा देण्याची ग्वाही सर्वांनी दिली. यावेळी कर्मचाऱ्यांनी विविध मागण्या मांडल्या आहेत. त्यात २०१७ पासूनची वार्षिक वेतनवाढ आणि महागाई भत्त्याची थकबाकी बँक खात्यात जमा करावी ही मुख्य मागणी आहे. यावेळी माजी विश्वस्त भूषण पाटील, जेएनपीटी विश्वस्त रवी पाटील, कामगार नेते संतोष पवार, पालक संघर्ष समितीचे अध्यक्ष किरण घरत, योगेश तांडेल, अविनाश म्हात्रे, रमाकांत म्हात्रे, विश्वास पाटील, रवींद्र घरत, पंचायत समितीचे किरण विठ्ठल घरत, नरसू पाटील, विकास कडू, काँग्रेस महिला अध्यक्ष रेखा घरत, एल.बी. पाटील आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.




## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**अधिसूचना क्रमांक 2/2025-26**

क्षेत्रीय रेल्वे प्रबंधक, कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी यांनी सिंधुदुर्ग, वैभववाडी, संगमेश्वर आणि माणगाव रेल्वे स्थानकांवर तीन वर्षांच्या कालावधीसाठी स्टेशन तिकीट बुकिंग एजंट (एसटीबीए) नियुक्त करण्यासाठी विहित नमुन्यात (अहस्तांतरणीय) सीलबंद निविदा (एकल बोली प्रणाली) आमंत्रित केल्या आहेत. **निविदा सूचना क्रमांक: केआर / आरटीएम / आरएन / सीओएमएल /एसटीबीए, तारीख: 12.08.2025. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख**: 15.09.2025, सकाळी 11.30 पर्यंत. **निविदा पेटी उघडण्याची तारीख**: 15.09.2025, सकाळी 11.40 पर्यंत. निविदा कागदपत्रे सिंधुदुर्ग, वैभववाडी, संगमेश्वर आणि माणगाव येथील संबंधित स्टेशन मास्टरच्या कार्यालयातून किंवा क्षेत्रीय यातायात प्रबंधक, केआरसीएल, एमआयडीसी, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयातून 14.08.2025 ते 12.09.2025 पर्यंत सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी 10:00 ते संध्याकाळी 16:00 वाजेपर्यंत प्रत्येक निविदा फॉर्मसाठी रु. 1180/- (जीएसटीसह) भरून मिळवू शकतात.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे देवघर ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालिल वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांकडुन कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबद्दल त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमच्या पक्षकारांस संमती दिली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | ग.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| मौजे देवघर ता.अलिबाग | २८९/१ | ००.९१.९० पो.ख. ००.०६.८० एकुण ००.९८.७० | २३.७६ |

सदर वर उल्लेखीत मिळकतीचे विद्यमान मालक सौ. मिनाक्षी दत्तात्रेय म्हात्रे, श्रीमती सुनिता दत्तात्रेय म्हात्रे, श्री. संतोष दत्तात्रेय म्हात्रे व सौ. रजनी सुधाकर म्हात्रे यांनी वरील मिळकत निर्वेध असल्याबाबत हवाला दिला आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, दान, गहाण, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही प्रकारे सदर मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्र व पुराव्यासहीत सादर कराव्यात.
मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून कुणाचीही तकार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे.

अलिबाग
दिनांक :१५/०८/२०२५

सही /
**ॲड. अभिषेक महेश पिसाट**
१७. अलिबाग कमर्शिअल कॉम्प्लेक्स,
बिग स्प्लॅश हॉटेल शेजारी, अलिबाग
ता.अलिबाग जि. रायगड
मो. ९५९५०३२३२०


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे सातिर्जे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दिलिप नारायण काळसेकर यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याबाबत आमचे अशिलांच्या वाटाघाटी चालू आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गटनं./ हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| सातिर्जे | ६३/अ/२ | ०-१७-८० पो.ख. ०-०३-९० ०-२१-७० | ३.२७ |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, अदलाबदल, कुळवहिवाट, कसवणुक या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ता. १५/८/२०२५

सही /-
**ॲड. माधवी नारायण ठाकूर**
सी-३०१, 'क्लिफ हेवन'
को. ऑप. हा. सोसायटी,
स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बाजूला,
कोर्ट रोड, अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक प्रदिप उत्तम वाघमारे, विनोद धर्नुधर खोपकर, सुरेखा प्रदिप वाघमारे यांचेसोबत चालु आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं | क्षेत्र (चौ.मी) | आकार |
|---|---|---|---|
| परहुरपाडा ता.अलिबाग जि.रायगड | २८२ | ०-४६-०० पो.ख.०-०५-८० एकूण ०-५१-८० | ११.७५ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी खाते क्र.४०६ क्षेत्र ०-२६-०० हे.आर आकार ६.६४ रू.पै.व खाते क्र.४२३ क्षेत्र ०-०८-०० हे.आर. पो.ख ०-०२-७० हे.आर. एकूण क्षेत्र ०-१०-७० रू.पै. आकार २.०४ रू.पै. क्षेत्राची मिळकत या जाहीर नोटीसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण,दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक :२८/०६/२०२५

सही/-
**ॲड.राकेश नारायण पाटील**
रा.आगरी पॅलेस, मु.पो.चिंचोटी
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९२७२६२०००५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, खालील प्रमाणे वर्णन केलेल्या जमीन मिळकती ह्या मिळकतीचे कब्जेदार/मालक १) रीता जगदीश खडावाला, २) नमिता हरिष खडावाला, ३) पिंकी रजनीकांत खडावाला, ४) रेखा राजेश खडावाला. ५) निर्मला मनसुखलाल खडावाला, ६) हरीश बाबुलाल खडावाला, ७) जगदीश बाबुलाल खडावाला, आणि ८) रजनीकांत बाबुलाल खडावाला यांचे कडून आमचे आशिल यांनी कायम खरेदी घेण्याबाबत मालकांसोबत बोलणी व करार केलेला आहे. सदर मिळकतीचे ७/१२ उताऱ्या प्रमाणे वर्णन खालील प्रमाणे.

**मौजे-घेरासुरगड, ता.रोहा, जि.रायगड.**

| अनु क्र. | गट क्रमांक व उपविभाग | जमीन मालकाचे नाव | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै |
|---|---|---|---|---|
| १ | २४ | रीता जगदीश खडावाला वै. ८ वर नमूद केल्या प्रमाणे | ३-५३-०० | २.१७ |
| २ | २५ | ..........''.......... | ०-०९-१० | ०.२३ |
| ३ | २७ | ..........''.......... | ०-०३-०० | ०.१८ |
| ४ | २८ | ..........''.......... | ०-१२-०० | ०.३० |
| ५ | २९ | ..........''.......... | ०-०६-१० | ०.०८ |
| ६ | ३० | ..........''.......... | ८-७१-०० | ५.५८ |
| ७ | ३६ | ..........''.......... | ०-०५-१० | ०.२७ |
| ८ | ३७ | ..........''.......... | ०-१३-१० | ०.५० |
| ९ | ३८ | ..........''.......... | ०-०६-९० | ०.३० |
| १० | ४२ | ..........''.......... | ०-१५-२० | ०.२५ |
| ११ | ४३/अ | ..........''.......... | ६-२७-०० | ४.६५ |
| १२ | ४३/ब | ..........''.......... | ३-६७-०० | ३.०२ |
| १३ | ४४ | ..........''.......... | ०-१०-१० | ०.१९ |
| १४ | ४५ | ..........''.......... | १-८०-०० | १.३९ |
| १५ | ४६/१ | ..........''.......... | ३-६०-०० | १.२० |
| १६. | ४७ | ..........''.......... | ३-८०-०० | २.८० |
| १७ | ४८/अ | ..........''.......... | ९-१२-०० | ६.८५ |
| १८ | ४८/ब | ..........''.......... | ४-७६-०० | ३.३४ |
| १९ | ५३ | ..........''.......... | ९-४४-०० | ५.७५ |
| २० | ५५ | ..........''.......... | ०-०२-८० | ०.४८ |
| २१ | ५६ | ..........''.......... | ०-१३-१० | ०.९७ |
| २२ | ५७ | ..........''.......... | ७-०८-०० | ४.७४ |
| २३ | ५९ | ..........''.......... | ०-०६-८० | ०.८० |
| २४ | ६२ | ..........''.......... | ०-०७-०० | ०.०६ |
| २५ | ६३ | ..........''.......... | ०-०९-९० | ०.५२ |
| २६ | ६५ | ..........''.......... | ०-०२-०० | ०.०२ |
| २७ | ६६ | ..........''.......... | ०-१७-२० | ०.४७ |
| २८ | ६७ | ..........''.......... | ०-०२-३० | ०.१९ |

तरी वरील मिळकतीचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षीस, चार्ज, ॲटेचमेंट, लीन, अखत्यार वैगरे कोणत्याही प्रकारचा हक्क -हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १४ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत रजिष्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकती या बोजाविरहीत आहेत. असे समजून आमचे आशिल सदर मिळकतींचा खरेदीखताचा व्यवहार मिळकतींचे मालकांसोबत पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. व त्या असणाऱ्या हरकती आमचे अशिलांचे लाभा मध्ये सोडून दिलेल्या आहेत असे समजण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

पेण.
दि.

सही/-
**श्री. नितीन हरिश्चंद्र पाटील**
ॲडव्होकेट
पाटील वाडा, महावीर मार्ग, कोवंडाळ तलाव,
पेण, ता. पेण, जि. रायगड.

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग
आर डी सी सी बँक

**निविदा सूचना**

बँकेची सन २०२४-२०२५ सालाची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ३०.०८.२०२५ रोजी आयोजित करणेत आलेली आहे. या वार्षिक सर्वसाधारण सभेकरीता सुमारे १५०० ते २००० भेटवस्तू खरेदी करणेकरीता सप्लायर्स/विक्रेते यांचेकडून तपशिल व भेटवस्तूंच्या दरासह निविदा मागविणेत येत आहेत.

तरी ज्या निविदा धारकांना आपल्या निविदा सादर करावयाच्या आहेत. त्यांनी आपल्या निविदा दिनांक २१.०८.२०२५ पर्यंत खाली सही करणारे यांचे नावाने सादर कराव्यात. रायगड जिल्ह्यातील निविदाधारकांना प्राधान्य देणेत येईल.

एक किंवा सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार बँकेचे संचालक मंडळ राखून ठेवीत आहे. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेत येईल. याबाबतची अधिक माहिती केंद्र कार्यालय अलिबाग येथे मिळेल.

केंद्र कार्यालय अलिबाग
दिनांक :- १५-०८-२०२५

सही/-
उपमुख्य कार्यकारी अधिकारी

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग
आर डी सी सी बँक

**निविदा सूचना**

बँकेची सन २०२४-२०२५ सालाची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ३०.०८.२०२५ रोजी आयोजित करणेत आलेली आहे. या वार्षिक सर्वसाधारण सभेकरीता सुमारे १५०० ते २००० नाश्ता पॅकेटस् बँकेला खरेदी करावयाचे आहेत. नाश्ता पॅकेटस् खरेदी करणेकरीता हॉटेल मालक/कॅटरर्स यांचेकडून दरपत्रकासह निविदा मागविणेत येत आहेत.

तरी ज्या निविदा धारकांना आपल्या निविदा सादर करावयाच्या आहेत. त्यांनी आपल्या निविदा दिनांक २१.०८.२०२५ पर्यंत खाली सही करणारे यांचे नावाने सादर कराव्यात. रायगड जिल्ह्यातील निविदाधारकांना प्राधान्य देणेत येईल.

एक किंवा सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार बँकेचे संचालक मंडळ राखून ठेवीत आहे. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेत येईल. याबाबतची अधिक माहिती केंद्र कार्यालय अलिबाग येथे मिळेल.

केंद्र कार्यालय अलिबाग
दिनांक :- १५-०८-२०२५

सही/-
उपमुख्य कार्यकारी अधिकारी

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, मुरूड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरूड, जि. रायगड)**
**ज.म.र. अर्ज २५४/२०२४**
**जाहीर नोटीस**

प्रति,
श्रीम. रुमाना शोएब फहीम,
रा.मु.पो. राजपुरी, ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड ... अर्जदार

विरूद्ध

ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत राजपुरी,
ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड ... सामनेवाला

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचे पती श्री. शोएब बशीर फहीम, यांचा जन्म दि. १९/०७/१९८० रोजी राहत्या घरी मौजे राजपुरी, ता. मुरुड-जंजिरा जि. रायगड येथे झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत राजपुरी कार्यालय यांचे जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, श्री. शोएब बशीर फहीम, यांचा जन्म दि. १९/०७/१९८० रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः मे. न्यायालयात दि. ०५/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांनी जन्म-मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०१/०७/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(संजय तवर)**
प्र. तहसिलदार मुरूड-जंजिरा

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय**
**जुने सचिवालय, विस्तार इमारत, पहिला मजला, एलफिस्टन कॉलेजच्या बाजूला, काळा घोडा, फोर्ट, मुंबई - ०३२**

क्र.अपिल/डेस्क/आरटीएस/रिव्ही/४०९/२०२५ दिनांक :- २९/०७/२०२५

**जाहीर नोटीस**

प्रति,
१. श्री. चंद्रशेखर दिनकर गोखले
२. श्रीमती आरती चंद्रशेखर गोखले
३. श्री. जयदिप चंद्रशेखर गोखले
४. श्रीमती मंजिरी दिलीप फळसणकर
क्र. १ ते ४ सर्व रा. २३-७८ मनमोहर सोसा.
कर्वेनगर, पुणे, जि. पुणे
५. श्रीमती स्नेहा राहुल अगरवाल
६. श्री. राहुल कुमार अगरवाल
७. श्रीमती हर्षा अगरवाल
८. श्री. प्रविण सिताराम अगरवाल
क्र. ५ ते ८ रा. शर्मिष्ठा तारांगण कॉम्प्लेक्स,
पोखरण रोड नं. ०१, ठाणे, मुंबई
क्र. १ स्वतःकरीता व क्र. २ ते ८ यांचा अखत्यारी म्हणून ... अर्जदार

विरूद्ध

१. श्रीमती तारामती शिवराम नलावडे
रा. सोनारवाडी, ता. माणगाव, जि. रायगड
२. श्रीमती तनुजा रविंद्र डवले
रा. उतेखोल, ता. माणगाव, जि. रायगड
३. श्री. राकेश शिवराम नलावडे
४. श्री. मारूती नामदेव यादव
५. श्रीमती राजेश्री रामचंद्र अंबिके
६. श्री. कृष्णा रघुनाथ नलावडे
७. श्री. दिपक रघुनाथ नलावडे
८. श्रीमती मंगल विनायक शेलार
क्र. ३ ते ८ रा. सोनारवाडी, पो. बोरवाडी,
ता. माणगाव, जि. रायगड
९. श्रीमती सविता नटवरलाल दोशी
१०. श्री. प्रल्हाद नटवरलाल दोशी
११. श्री. किशारे नटवरलाल दोशी
१२. श्रीमती प्रणिता प्रमोद शेठ
क्र. ९ ते १२ रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड
१३. श्रीमती चेतना प्रदीप गांधी
रा. माणगाव, ता. माणगाव, जि. रायगड
१४. श्रीमती सुलोचना मारूती नलावडे
१५. श्रीमती चेतना चंद्रकांत पानकर
१६. श्री. संतोष बाबू नलावडे
क्र. १४ ते १६ रा. सोनारवाडी,
ता. माणगाव, जि. रायगड ... सामनेवाले

**विषय : अपर जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील आदेश क्र. हक्कनोंद/अपिल क्र. ३४/२०२४ दि. ०७/०३/२०२५ चे विरूद्ध फेरतपासणी अर्ज**

सामनेवाले यांस कळविण्यात येते की, वरील फेरतपासणी अर्जाची सुनावणी मा. अतिरिक्त विभागीय आयुक्त. कोकण विभाग मुंबई यांचेसमोर त्यांचे जुने सचिवालय, १ ला मजला, विस्तार भवन, फोर्ट, मुंबई-३२ येथील कार्यालयात दिनांक १९.०८.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे. वरील दिवशी व वेळी आपण स्वतः अगर वकीलामार्फत किंवा प्राधिकृत अभिकर्त्या मार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे. वरील तारखेस आपण हजर राहून म्हणणे न मांडल्यास फेरतपासणी अर्जाचे कामी आपणास काही सांगणे नाही असे समजण्यास येऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सही/-
**(वैभव गुहागरकर)**
नायब तहसिलदार (अपिले)
अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग करीता

## अलिबाग वन विभाग
**जाहिरनामा**

तमाम लोकांस कळविणेंत येते की, अलिबाग वन विभागात खालील शासकिय वाहन व वनगुन्ह्यांत जप्त (भंगार) वाहनांचे जाहिर लिलाव उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग हे खाली दर्शविलेल्या ठिकाणी व दिवशी उघड बोली पद्धतीने करणार आहेत.

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार व क्रमांक | वाहन ठेवलेले ठिकाण | लिलावाचे ठिकाण व वेळ | लिलाव दिवस व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | MH-०४EL-६२४२ NCV-TATA | साजगांव डेपो | साजगांव डेपो सकाळी ११.०० वाजता. (खालापुर रेंज) | बुधवार दि. ०४/०९/२०२५ |
| २ | MTB -९८६० MCL ELCHER | साजगांव डेपो | | |
| ३ | AP-१६-TX-४९६६ ELCHER | साजगांव डेपो | | |
| ४ | MH-०६-BK-२०१२ MCV | नागोठणे डेपो | साजगांव.डेपो सकाळी ११.०० वाजता (खालापूर रेंज) | |
| ५. | GY-१५-YY-६५२० टेम्पो | नागोठणे डेपो | | |

१. ज्या लिलावदारांना लिलावात भाग घ्यावयाचा आहे अशा लिलाव धारकांनी शासनाने पारित केलेले निवडणूक मतदान कार्ड, पॅनकार्ड, विद्युत बील, रेशनकार्ड, आयकर/विक्रीकर रिटर्न, दुरध्वनी बील इ. दस्तऐवजापैकी एकाची साक्षांकित प्रत लिलावाचे वेळी सादर करणे बंधनकारक आहे.
२.लिलावाच्या अटी व शर्ती नियम क्र.०२ अन्वये अनामत रक्कम भरल्याशिवाय कोणत्याही खरेदीदारास बोली बोलता येणार नाही.
३. लिलावासंबधीच्या अटी व शर्ती उप वनसंरक्षक अलिबाग, सहा. वनसंरक्षक अलिबाग पनवेल तसेच वनक्षेत्रपाल, सर्व यांचे कार्यालयांत उपलब्ध होतील.
४. सदर शासकिय वाहन व जप्त वाहने (भंगार) हे ठेकेदार यांनी लिलावापुर्वी प्रत्यक्ष जागेवर जाऊन खात्री करणेची आहे.
५.लिलांवाचे अटी व शर्ती जाहीरनाम्याचे QR कोडवर सुध्दा उपलब्ध आहे.
६.जाहिर केलेला लिलाव रद्द अगर तहकुब करणेचा अधिकार खालील सही करणार हे राखुन ठेवत आहेत.
७. वर नमूद लिलावाच्या अटी, शर्ती वन विभागाचे mahaforest.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करणेत आलेल्या आहेत.

जावक क्र.ब/वनगुन्हे/२४३०
दिनांक -१३/०८/२०२५
ठिकाण -अलिबाग

सही/-
**राहुल पाटील (भा.व.से.)**
**उपवनसंरक्षक,**
**अलिबाग वनविभाग अलिबाग**

***जिमाका/रायगड/जाहिरात/१२९/११२३/२०२५***

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस आणि सर्व संबंधित व्यक्तींना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात व त्यांचे निदर्शनास आणून दिले जाते आहे की, माझे वडील कै.आशिष महेश पवार यांचे दि.०२/०२/२०२० (अक्षरी दिनांक दोन फेब्रुवारी दोन हजार वीस) रोजी निधन झाले असून त्यांच्या नावे मौजे-सासवणे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील जमीन गट नं.१३१, एकूण क्षेत्र :०-०५-६० हे.आर. ही सामाईक मालकीची जमिन मिळकत आहे.

माझी आई, श्रीमती. भाग्यश्री आशिष पवार, तत्कालीन वय २२ वर्षे, ही सन २००५ साली आमचे घर कायमचे सोडून गेली असून कोणताही संबंध ठेवला नाही व ती त्यानंतर कधीही परतली नाही वा तिने कोणत्याही प्रकारचा संपर्क केलेला नाही. सध्या ती कोठे राहते याची माहिती मला नाही त्यामुळे तिचा संपर्क होणे शक्य झालेले नाही त्यामुळे ती व तिच्या वतीने कोणीही या मिळकतीवर कोणताही दावा करणार नाही.

तरी कोणी या मालमत्तेवर हक्क सांगू इच्छित असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मिळकतीशी संबंधित सर्व कागदपत्र आणि पुराव्यासहित खालील पत्त्यावर संपर्क साधावा. पुढील ३० दिवसांच्या आत कोणीही सदर नोटीशीस हरकत न केल्यास सदरहू मिळकतीवर कोणत्याही स्वरूपाचा हक्क व दावा करण्याचा नाही असे गृहीत धरून पुढील कायदेशीर प्रक्रिया राबवली जाईल आणि माझे वडिल (कै.आशिष महेश पवार) यांच्या नावावरील जमीन त्यांचा एकमेव कायदेशीर वारसदार म्हणून माझ्या (श्री.आयुष आशिष पवार) नावाची नोंद करण्याची कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

संपर्काचा पत्ता:
नाव: श्री.आयुष आशिष पवार
पत्ता: मु. सासवणे, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१

हक्कदार/अर्जदाराचे नाव व सही
**(श्री.आयुष आशिष पवार)**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे सावळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक केतन रणजितसिंग नेगांधी व मोहम्मद इरफान सलीम सिद्धीकी यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे सावळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ९४ | ४ | ०-२४-०० | ०-२२ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४(चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १३/०८/२०२५
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

दिनांक १४/०८/२०२५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे नाडसुर ता.सुधागड जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - नाडसुर ता.सुधागड जि.रायगड**

| कब्जेदाराचे नांव | गट न./स. नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| अनघा अनिल भगत | ३६९ | ०-५६-३० | ३-८६ |
| व २ | ३६६ | ०-३१-७० | १-१० |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहिवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्यपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहीवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहीवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत १४ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पाली - सुधागड
दिनांक : १४/०८/२०२५

सही /-
**श्री. प्रभाकर कृष्णकांत भोईर**
ॲडव्होकेट
मु.पो.नविन पनवेल ता.पनवेल जि.रायगड
मो.बा.नं.८१४९६५१५०८

# निवडक



## श्रीवर्धन येथे रानभाजी महोत्सव

**श्रीवर्धन :** तालुका कृषी विभागामार्फत श्रीवर्धन येथील सुपारी संशोधन केंद्रात कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा व सुपारी संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार (दि.१३) रोजी सकाळी अकरा वाजता तालुकास्तरीय रानभाजी महोत्सव उत्साहात पार पडला. यावेळी तालुक्यातील प्रगतशील शेतकरी उपस्थित होते.

महोत्सवामध्ये करटोली, कवळा, सुरण, भारंगी, टाकळा, आघाडा, पेवा, केळफुळे, माठ आदी विविध रानभाज्यांचे प्रदर्शन व विक्री करण्यात आली. महोत्सवाचे उद्घाटन उद्यान पंडित पुरस्कार प्राप्त शेतकरी बाळकृष्ण तथा उदय गणेश बापट यांच्या हस्ते झाले. त्यांनी प्रदर्शनातील रानभाज्यांची पाहणी करून रानभाज्यांचे आरोग्य व औषधी गुणधर्मांबाबत सविस्तर माहिती दिली आणि उपस्थित शेतकऱ्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात तालुका कृषी अधिकारी श्रद्धा डुंबरे यांनी रानभाजी महोत्सव साजरा करण्यामागील हेतू स्पष्ट केला. यानंतर प्रभारी अधिकारी, सुपारी संशोधन केंद्र डॉ. सिद्धेश सावंत यांनी रानभाज्यांचे आहारातील महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. श्रीवर्धन नगरपरिषद शाळा क्रमांक दोन येथील विद्यार्थ्यांना रानभाज्यांची ओळख व त्यांचे आहारातील महत्त्व पटवून देण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका अस्मिता नलावडे उपस्थित होत्या. महोत्सवात सहभागी शेतकऱ्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. आभार प्रदर्शन मंडळ कृषी अधिकारी श्रीम. कदम यांनी मानले, तर सूत्रसंचालन सहाय्यक कृषी अधिकारी डी.बी. कुंभारकर यांनी केले. यावेळी उपकृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, कृषीसेवक व शेतकरी उपस्थित होते.



## ‘श्रावण सरी’ कार्यक्रम उत्साहात

**माणगाव :** माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव येथील महिला विकास कक्षातर्फे बुधवार, १३ ऑगस्ट २०२५ रोजी ‘श्रावण सरी’ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एम. खामकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एम.खामकर उपस्थित होते. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून नेहा कपिल गायकवाड व रेश्मा हेमंत गांधी उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेतून प्रा. वृषाली सालस्कर यांनी कार्यक्रमाची रूपरेषा व प्रयोजन सांगितले.

प्रमुख अतिथी नेहा गायकवाड यांनी आपल्या भाषणात श्रावण महिन्याचे सांस्कृतिक आणि पारंपरिक महत्त्व विशद केले. तसेच महिला विकास कक्षाच्या या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. बी.एम. खामकर यांनी श्रावण महिना म्हणजे निसर्गाचं लोभस रुप, भक्ती, परंपरा आणि सृजनशीलतेचा संगम. या महिन्यातले हे सांस्कृतिक कार्यक्रम आपल्या संस्कृतीची श्रीमंती, कलाविष्कार आणि सामाजिक एकतेचं दर्शन घडवतात, असे आपल्या मनोगतामध्ये व्यक्त केले.तसेच प्रा. श्रावणी भक्कम यांनी आपल्या मनोगतामध्ये अशा कार्यक्रमांतून सांस्कृतिक वारसा जतन केले जाते असे विचार व्यक्त केले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी श्रावणातील सणांवर आधारित विविध कला सादर केल्या. यामध्ये पारंपरिक गाणी, नृत्य आणि श्रावण महिन्याच्या विविध खेळांचे सादरीकरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महिला विकास कक्ष प्रमुख प्रा. वृषाली सालस्कर, सर्व सदस्य प्रा. अंकिता म्हस्के, प्रा. आयेशा बडे, प्रा. श्रावणी बक्कम, डॉ. नमिता मोरे, प्रा. अश्विनी शेलार, प्रा. तेजस्विनी आचार्य, प्रा. नाझिया जुम्मल, प्रा.श्वेता सकपाळ यांनी मेहनत घेतली. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापिका आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## शांतता समितीचे आयोजन

**आगरदांडा :** आगामी गोकुळाष्टमी, गौरी-गणपती आदी सण शांततामय वातावरणात सौहार्दाने साजरे व्हावेत, कुठेही कायदा सुव्यवस्थेचा भंग होणार नाही, या उद्देशाने मुरुड पोलीस ठाण्यातर्फे शांतता समितीची सभा तहसीलदार आदेश डफळ यांच्या अध्यक्षतेखाली दर्यासारंग सभागृहात संपन्न झाली. यावेळी पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, वासंती उमरोटकर, मंगेश दांडेकर, अरविंद गायकर, मुसद्दीक कादिरी, नयन कर्णिक, नैनिता कार्णिक, घनश्याम श्रीवर्धनकर, जाहिद फकजी, पांडुरंग आरेकर, नांदगाव सरपंच शेजल घुमकर, दिनेश मिणमिणे आदींसह शासकीय व निमशासकीय कार्यालयाचे पदाधिकारी उपस्थित होते. या शांतता समितीच्या सभेमध्ये मंगेश दांडेकर यांनी मुरुड या पर्यटनस्थळी येणाऱ्या भंगारवाले आदी परप्रांतियांची नोंद व्हावी, बाजारपेठेत पार्किंगची व्यवस्था व्हावी. तसेच शांतता समितीच्या सदस्यांच्या सूचनांची कार्यवाही व्हावी, अशी मागणी केली. गणेशोत्सवात विक्रम रिक्षांना योग्य ठिकाणी वाहनतळ मिळावे जेणेकरून रहदारीला अडथळा होणार नाही, अशी मागणी अविनाश दांडेकर यांनी केली. गणपती कारखानदारांना थोडेच दिवस मिळणार असल्याने भारनियमन टाळून विद्युतपुरवठा खंडित होणार होऊ नये तसेच शाडू मातीच्या गणेशमूर्तींना आगमन व विसर्जनप्रसंगी शहरातील खड्डे भरण्याची मागणी बाबू सुर्वे यांनी केली. मुरुड शहरात जातीय सलोखा टिकून राहण्यासाठी हिंदू-मुस्लीम समाजाने पुढाकार घ्यावा तसेच धर्मवेड्या लोकांना वेळीच आवर घालण्याचे नम्र आवाहन प्रमोद भायदे यांनी केले. मुस्लिम समाजाचे शकील कडू यांनी या पुढे अशा प्रकारची कोणतीही कृती शहरात आम्ही घडू देणार नाही याची ग्वाही दिली. शहरात नादुरुस्त सीसीटीव्ही कॅमेरे, मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण आदी समस्यांची यादीच शांतता समितीच्या सदस्यांनी पोटतिडकीने मांडून प्रशासनाने कार्यवाही करावी, अशी आग्रही मागणी केली.

# खड्डेमुक्तीसाठी शेकाप आक्रमक

## गणेशोत्सवापूर्वी खड्डे न बुजविल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

**अलिबागसह रायगड जिल्ह्यातील अंतर्गत रस्त्यांसह महामार्गावरील रस्त्यांवर ठिकठिकाणी खड्डे पडले आहे. या खड्ड्यांमधून प्रवास करताना प्रवाशांना प्रचंड त्रास होत आहे. गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. मात्र, अजूनपर्यंत खड्ड्यांची दुरुस्ती करण्यास सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा परिषद बांधकाम विभाग उदासीन ठरला आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या शेकापने खड्डेमुक्तीसाठी आक्रमक भूमिका घेतली आहे. संबंधित विभागाला शेकापच्या वतीने निवेदन देऊन गणेशोत्सोपूर्वी खड्डेमय रस्त्यांची दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिला आहे.**



यावेळी शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख अ‍ॅड. मानसी म्हात्रे, शेकाप तालुका अलिबाग तालुका चिटणीस सुरेश घरत, रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुळकर्णी, सतीश प्रधान, अनिल चोपडा, संजना किर, विक्रांत वार्डे, नागेश्वरी हेमाडे, नंदू गावडे, अशोक प्रधान, निलेश खोत, विकास घरत, निनाद रसाळ यांसह शेकापचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गणरायाचे आगमन येत्या २७ ऑगस्टपासून घरोघरी होणार आहे. हा उत्सव साजरा करण्यासाठी मुंबईसह वेगवेगळ्या भागातून चाकरमानी अलिबागसह जिल्ह्यात येणार आहेत. गणरायाचे आगमन काही दिवसांवर असताना अनेक रस्त्यांची अवस्था बिकट झाली आहे. खड्ड्यांमुळे वाहनचालक आणि पादचारी हैराण आहेत. शासन मात्र कानावर हात ठेवून बसल्याचे चित्र आहे. अखेर जनतेच्या भावनांचा विचार करून शेतकरी कामगार पक्ष रस्त्यावर उतरला. जिल्हा परिषद बांधकाम आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात गुरुवारी (दि.१४) धडक देत अधिकाऱ्यांना जाब विचारण्यात आला. मानसी म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली शेकापच्या कार्यकर्त्यांनी शेतकरी भवन ते थेट सरकारी कार्यालये गाठली. मुख्य रस्त्यांवरील खड्डे तातडीने भरावेत, गणेशोत्सवाआधी दुरुस्तीची कामे पूर्ण करावीत, अशी मागणी करण्यात आली. गणेशोत्सवाआधी रस्ते न दुरुस्त झाल्यास यापेक्षा मोठे आणि उग्र आंदोलन करण्यात येईल, याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील, अशा इशारा दिला.

# अवैध दारूच्या बाटल्या जप्त

## पोलिसांकडून लाखोंचा मुद्देमाल जप्त

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील मांडवा दस्तुरी फाटा येथे अवैध दारू विक्रीविरोधात मांडवा सागरी पोलिसांनी बुधवारी (दि. १३) धडक कारवाई करत १ लाख १७ हजार १८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कारवाईत ९२१ देशी व विदेशी दारूच्या बाटल्या हस्तगत करण्यात आल्या.

पेट्रोलिंगदरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, आरोपी प्रकाश प्रेमनाथ जयस्वाल (३३, रा. दस्तुरी फाटा, मांडवा, मूळ रा. पटना, बिहार) संदिप बिअर शॉपीच्या मागे अवैध दारूची विक्री करत असल्याचे उघड झाले. पोलिसांनी तातडीने छापा टाकून आरोपीला ताब्यात घेतले. तपासात त्याच्या शेडमधून मॅकडॉल नंबर १ ओरीजनल, रॉयल ग्रीन व्हिस्की, डीलक्स ब्लॅक व्हिस्की, ओकस्मिथ गोल्ड, ब्लॅक अँड व्हाईट, अ‍ॅबसॉल्ट व्होडका, चिवास रिगल अशा विविध ब्रँडच्या दारूच्या बाटल्या सापडल्या.



ही कारवाई रायगडचे पोलीस अधीक्षक आचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांच्या अधिपत्याखाली आणि पोलीस उपअधीक्षक जालिंदर नालकुल यांच्या देखरेखीखाली करण्यात आली. पुढील तपास मांडवा सागरी पोलिसांकडून सुरू आहे.

# शेतीशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद

## तालुका कृषी अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन

**| पाली | प्रतिनिधी |**

वावळोली येथे क्रॉपसॅप योजनेंतर्गत भात पिकावरील शेतकऱ्यांच्या शेती शाळेच्या तिसऱ्या वर्गाचे आयोजन श्रीनाथ भैरवनाथ मंदिर वावळोली येथे दि. १२ ऑगस्ट रोजी करण्यात आले होते. या शेतीशाळेत सिद्धेश्वर बु. व वावळोली येथील भात उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शेतीशाळा तिसऱ्या वर्गाची आयसीएम टाळी, शेतकरी प्रतिज्ञाने सुरुवात करण्यात आली. मंडळ कृषी अधिकारी पाली उदय भोसले यांनी या शेतीशाळा वर्गात भातपीक परिसंस्था विश्लेषण संकल्पना व निरीक्षणे याबाबत माहिती दिली. तसेच सरिता किंजवडे यांच्या भात प्रक्षेत्रावर जाऊन भात पिकावरील विविध कीड व रोग यांची ओळख शेतकऱ्यांना करून दिली. तसेच खोडकिडा या किडीवर लघु अभ्यास घेण्यात आला. चतु:सूत्री भात लागवड प्रक्षेत्र पाहणी आणि कामगंध सापळ्यांचा खोडकिडा नियंत्रणात असणारा उपयोग याबाबतचे प्रात्यक्षिक समस्त शेतकऱ्यांना दाखवण्यात आले.

या शेतीशाळेस सिद्धेश्वर बु. ग्रुप ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंच आशिका पवार, उपसरपंच शरद किंजवडे,माजी सरपंच आणि विद्यमान ग्रामपंचायत सदस्या समृद्धी यादव, ग्रामपंचायत सदस्या वर्षा फाळे, सिद्धेश्वर बु. पोलीस पाटील सुनील पोंगडे, ग्रामपंचायत लेखनिक गणेश महाले व सिद्धेश्वर बु. व वावळोली येथील भात उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

भात शेतीशाळेस तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील सहाय्यक कृषी अधिकारी अतुल क्षीरसागर, मिलिंद माळी, मयूर शिंदे, विनायक गलांडे, संकेत टेळे यांचे सहकार्य लाभले. सहाय्यक कृषी अधिकारी आदित्य तितर यांनी शेतीशाळा वर्ग यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

# कोप्रोलीत शेती विषयक मार्गदर्शन

**| उरण | प्रतिनिधी |**

कोप्रोली येथे शासनाच्या UNDP-GCF प्रकल्पातून भारताच्या तटीय समुदायाची हवामान लवचीकता वाढविणे अंतर्गत तसेच तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ-नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली भातपीक शेतीशाळा वर्ग क्रं-३ घेण्यात आला. तसेच उपस्थित डॉ. जीवन आरेकर, शास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र किल्ला रोहा यांनी उपस्थित शेतकऱ्यांना भात पिकावरील कीड व रोग व त्यावरील उपाय योजना, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, विविध मित्र व शत्रू किडी व शेतातील त्यांचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी मंडळ कृषी अधिकारी शुभम गटकळ, उपकृषी अधिकारी शिवाजी लोहकरे आदी मान्यवर उपस्थित होते.

# वन विभागाची रस्ता बनविण्यास आडकाठी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत येथील किरवली वाडी ते जुन्मापट्टी वाडी पर्यंत माथेरान डोंगर रांगेत असलेल्या १३ वाड्यांना जोडणारा रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजूर आहे. सदर रस्त्याचे काम वन जमीन मिळत नसल्याने सुरू केले जात नाही.त्यामुळे या आदिवासी भागातील दोन आदिवासी कार्यकर्ते हे १५ ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता आत्मदहन करणार आहेत. दरम्यान, वन जमिनीचा प्रश्न गेले वर्षभर सुटला नाही आणि त्यामुळे या आदिवासी कार्यकर्त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले आहे.

कर्जत तालुक्यात स्वातंत्र्यदिनी रास्तारोको करून आत्मदहन करणार आहेत. देश स्वातंत्र्याला ७९ वर्षे होऊनही माथेरान डोंगर पट्ट्यातील १३ आदिवासी वाड्यांना आजही रस्ता नाही. रस्त्याअभावी अनेक बांधवांना वेळेवर उपचार न मिळाल्याने (सर्पदंश, बाळंतपणा, विंचूदंश, इतर आजारपणामुळे) आपला जीव गमवावा लागला आहे.शालेय विद्यार्थी, मोलमजुरी करणारे अनेक बांधव, शेतकरी यांना रोजच अवघड वाट/मार्ग चालून आपले काम करावे लागत आहेत. रस्त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना आपले उच्च शिक्षण पूर्ण करता येत नाही. अशा अनेक संकटांना रस्ता नसल्याने रोजच डोंगरपट्ट्यातील आदिवासी बांधवांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे रस्त्यासाठी सामाजिक कार्यकर्ते आदिवासी बेकरेवाडी येथील जैतू सदू पारधी आणि गणेश हिरु पारधी दोघे आत्मदहन करणार आहेत.



# आगामी निवडणुकांसाठी कोकण विभाग सज्ज

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

चालू वर्षात होणाऱ्या जिल्हा परिषद, नगर पंचायत व महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वसमावेशक आढावा बैठक राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी कोकण विभागात पार पडली. कोकण भवनातील पहिल्या मजल्यावरील समिती सभागृहात दोन सत्रांमध्ये ही बैठक घेण्यात आली. या बैठकीत आगामी सर्वत्रिक निवडणुकीच्या पूर्वतयारीतील प्रत्येक टप्प्याचा आढावा घेण्यात आला. मतदार यादी अद्ययावत करणे, मतदान केंद्रांचे नियोजन, कर्मचारी व सुरक्षा व्यवस्था, तसेच मतदार जनजागृतीसाठीच्या उपक्रमांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीस राज्य निवडणूक अयोगाचे सचिव सुरेश काकाणी (भा.प्र.से.), कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, राज्य निवडणूक आयोगाचे विशेष कार्यकारी आधिकारी अं.गो. जाधव, ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आयुक्त अभिनव गोयल, वसई-विरार महानगरपालिका आयुक्त एम.एम. सूर्यवंशी, मिरा-भाईंदर महानगरपालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा, उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त मनिषा आव्हाळे, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका आयुक्त अनमोल सागर, जिल्हाधिकारी ठाणे डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ, जिल्हाधिकारी रायगड किशन जावळे,

### मतदान केंद्रांचे नियोजन व सुविधा

**सर्व मतदान केंद्रे मतदारांसाठी सहज उपलब्ध, सुरक्षित आणि सोयीस्कर असावीत. पिण्याचे पाणी, वीज, शौचालय, रॅम्प, प्रकाशव्यवस्था आणि सावलीची सोय सुनिश्चित करणे. अपंग व ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देणे. संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर केंद्रीय सुरक्षा दल, सीसीटीव्ही व वेबकास्टिंगसह कडक सुरक्षा तैनात करण्याबाबत सूचना दिल्या.**

जिल्हाधिकारी पालघर इंदूराणी जाखड, जिल्हाधिकारी रत्नागिरी एम. देवेंदर सिंह, जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग अनिल पाटील तसेच निवडणूक संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कोकण विभागांतर्गत येणाऱ्या मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या ७ जिल्ह्यांमध्ये एकूण ७५ विधानसभा मतदारसंघ आहेत. ७ जिल्ह्यांमधील महसूल गावांची एकूण संख्या ६ हजार ५३० असून, या गावांमधील लोकसंख्या २ कोटी ८६ लाख १ हजार ४७१ आहे. कोकण विभागतील ५ जिल्ह्यांमध्ये ४५ पंचायत समित्या आहेत. त्यात ठाणे ५, पालघर ८, रायगड १५, रत्नागिरी ९ आणि सिंधुदुर्ग ८ अशा पंचायत समित्या आहे. कोकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यांमध्ये एकूण २७ नगरपरिषद/नगरपंचायत आहेत. त्यात ठाणे -०२, पालघर-०४, रायगड-१०, रत्नागिरी-०७ आणि सिंधुदुर्ग-०४ अशा आहेत.

## अमेरिकेतील नासाची सवारी ग्रामीण भागातील विद्यार्थ्याच्या जिद्दीला यश

# श्रेयसचे स्वप्न साकार सत्यात उतरवले

**| मुंबई | प्रतिनिधी |**

**अमेरिका येथील नासा दौऱ्यासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये कुडूक खुर्द हनुमानवाडी येथील शेतकरी कुटुंबातील श्रेयस गजानन पवार यांनी नुकताच अमेरिका दौरा केला आणि अंतराळ संशोधन तसेच अमेरिकेच्या इतिहासाची प्रत्यक्ष माहिती घेतली.१२ दिवसांचा नासा अमेरिका दौरा ३० जुलै ते १२ ऑगस्ट या कालावधीदरम्यान यशस्वीपणे पार पडला.**



रत्नागिरी जिल्हा परिषदेने राबवलेल्या ‘जाणू विज्ञान अनुभवू विज्ञान’ या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना नासा इस्रोला भेट देण्याचा नाविन्यपूर्ण उपक्रम शिक्षण विभाग प्राथमिक जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्यामार्फत गेल्या तीन वर्षांपासून राबवण्यात येत आहे. यावर्षीही विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. यामुळे ग्रामीण भागातील गुणवत्ता असणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा फायदा झाला आहे. श्रेयसने जिद्द, चिकाटी, मनापासून केलेले प्रामाणिक प्रयत्न याने आकाशाला गवसणी घालण्याचे स्वप्न सत्यात पाहिलं आहे. या अंतराळ संशोधन संस्था पाहण्यासाठीची संधी गगनभरारी मिशनच्यावतीने सुरू करण्यात आले.

गावातील जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा कुडुक खुर्द नं.१ या शाळेत इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत शिक्षण घेत श्रेयसने स्पर्धा परीक्षेसाठी सुरुवात केली. गेल्या तीन वर्षांपासून तो यासाठी तयारी करत होता. यामध्ये कुडूक खुर्द शाळेचे माजी मुख्याध्यापक वैभव धुमाळ यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षेसाठी तयार करण्यावर भर दिला. केंद्रस्तर, बीटस्तर, तालुकास्तर आणि जिल्हास्तर असे चार परीक्षेचे टप्पे यासाठी पार करावे लागतात, यामध्ये एकूण १०० गुणांची प्रश्नपत्रिका असते. भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, रसायनशास्त्र, सामान्यज्ञान, अशा विषयांचा अभ्यासक्रमाचा समावेश होता. मागील दोन वर्षे सातत्याने सराव असल्यामुळे अभ्यासाचा पाया पक्का झाला होता. यादरम्यान शाळेचे मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समिती यांनी त्यांच्याकडून प्रश्नपत्रिका सोडवत, त्यावर चर्चात्मक आणि दिवसाला साधारण चार ते पाच तास रोज अभ्यास करून घेतला. यादरम्यान सुट्टीचा दिवस न वगळता शनिवार आणि रविवार, सणवार कोणत्याही दिवशी दांडी न मारता, पूर्ण तयारीसाठी श्रेयसला घडवत, त्यांच्याकडून सराव परीक्षा स्पर्धात्मक परीक्षेच्या अभ्यासाचे धडे देत, नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या नासा अमेरिका विद्यार्थी निवड चाचणी परीक्षा अभ्यासक्रमात तो उत्तीर्ण झाला.

श्रेयस पवार सध्या भेलोशी पंचक्रोशी माध्यमिक विद्यालयात भेलोशी येथे आठवी मध्ये शिक्षण घेत आहे. या परीक्षेत संपूर्ण मंडणगड तालुक्यातून एकच विद्यार्थी आलाय. शेतकरी कुटुंबातील श्रेयस पवार अमेरिका येथील नासा दोऱ्यामध्ये राजधानी, नासच्या केनेडी स्पेस सेंटरला,द स्फिअर, ग्रँड कॅनियन व हूवर डॅमला अशा विविध ठिकाणी भेट दिली. श्रेयस परत येताच पवार कुटुंबांनी स्वागत केले, तर कुडूक खुर्द हनुमानवाडी ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

> **मी या परीक्षेसाठी खूप अभ्यास केला होता. परीक्षेचे तिन्ही टप्पे मी उत्तीर्ण झालो आहे. यासाठी विज्ञान आणि सामान्य विज्ञान, भूगोल हे मुख्य विषय होते. त्यासाठी लागणारी सर्व पुस्तकं आमच्या शाळेतील शिक्षकांसह आईवडिलांनी मला उपलब्ध करुन दिली होती. मला नुकतीच अमेरिकेत जाण्याची संधी मिळालीय, याचा खूप आनंद होत आहे. अमेरिकेत मला तेथील शास्त्रज्ञ तसंच नासा संस्थेचं काम जवळून पाहण्याची संधी प्राप्त झाली आहे, याचा मला आनंद आहे. त्यामुळे मी खूप समाधानी आहे.**
> **– श्रेयस पवार, विद्यार्थी**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)